किंमत - वार्षिक वर्गणी १००/- रुपये

# अर्थबोधपत्रिका

आपल्या आजूबाजूस घडणाऱ्या विविध घटनांचा

'अर्थ'बोध करून देणारे मासिक

INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY LIBRARY 17/9/06


३ ●नवचिंतन

५ ●जिहाद की इज्तिहाद ?

१० ●नव्या जगातील इज्तिहादकडे.....

१५ ●जग विनाशाच्या दिशेने ?
(अमेरिकेचे अण्वस्त्रकेंद्री धोरण)

२० ●प्रशिक्षणाची कवचकुंडले

२३ ●व्यथा शहरी वृद्धांच्या

२६ ●आव्हान शहरीकरणातील असमतोलाचे

३१ ●परिचय : मॉडर्निटी

३२ ●जिकडे-तिकडे
● 'जेन्डर बजेट'चे पहिले पाऊल

३४ ●'काल'चे 'आज'साठी
(लग्नाचा प्रसंग, विचाराने करावा यथासांग...)


खंड ५ : अंक ६ सप्टेंबर २००६

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

वार्षिक वर्गणी १००/- रुपये

(परदेशस्थ वाचकांसाठी $२०)

वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका' दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.**


**वर्गणीसाठी पत्ता :**

**व्यवस्थापक, अर्थबोधपत्रिका,**

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, (रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.

फोन : २५६५७१३२, २५६५७२१०

फॅक्स : २५६५७६९७

ई-मेल: ispe@vsnl.com



**अर्थबोधपत्रिका**

**खंड ५ (अंक ६) सप्टेंबर २००६**

**संपादक - अभय टिळक**

**साहाय्यक संपादक - राज्यश्री क्षीरसागर**


### *'अर्थबोधपत्रिके'तील माहिती कशी?*

- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- नि:पक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक
- हाताशी असणाऱ्या मोजक्याच वेळात जगाबद्दलचे भान वाढविणारी

### *'अर्थबोधपत्रिके'चा हेतू*

प्रतिष्ठित व अग्रगण्य नियतकालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यत: इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.

### *'अर्थबोधपत्रिका'कशी साकारते?*

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.


◆अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे किती-तरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे. - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी.

# नवचिंतन

सकाळ रोजच होत असते. पण दरदिवशीची सकाळ वेगळी असते. ताजी असते. म्हणूनच नवीन दिवसाची सुरुवात होताना आपण ताजेतवाने असतो. पानावर बसले की रोजच्या जेवणात तीच भाजीभाकरी ताटात पडते. मात्र, प्रत्येक दिवसाच्या अन्नब्रह्माची अनुभूती आगळी असते. तीच साखर, तेच दूध आणि चहाचा ब्रँडही अगदी तोच असला तरी चहाच्या हर कपाची लज्जत न्यारी ती न्यारीच. आपल्या मनात अक्षरशः अगणित विचारांची सर्कस चालू असते. किती तरी बाबी अशा असतात की मनःपटलावर त्या दिवसातून किमान एकदा तरी हजेरी लावून जातातच. मात्र, एखाद्या दिवशी अवचितच त्यापैकी एखादीचे आपल्याला एकदम नव्यानेच आकलन होते. तेथवर कधीही झाला नसेल अशा प्रकारे तिचा उलगडा होऊन जातो... ही यादी अशीच कितीही लांबवर वाढवता येईल. हे असे का घडत असावे, याचा विचार आपल्यापैकी कितीजण सजगपणे करतात, हीसुद्धा एक कुतूहलाचीच बाब आहे. शोधायला गेले तर या प्रश्नाचे उत्तर गवसणे हे फारसे अवघड नाही, हे आपल्याला उमगेल. कळत न कळत का होईना, परंतु, प्रत्येक क्षणी आपण जाणिवेच्या नवीनच कवडशात न्हाऊन निघत असतो, हे वास्तव आपल्याला जाणवते का ? प्रतिक्षणी आपण 'नूतन' असतो. केवळ आपणच नाही तर भवतालची सारी सृष्टीही स्वरूपतःच परिवर्तनशील आहे. म्हणूनच हा सारा पसारा नित्यनूतनाचा आहे, असेही आपण म्हणतो. याचाच अर्थ हा की सभोवतालच्या वास्तवाला भिडत असताना या गतिमानतेचे अवधान आपण ठेवणे, हे अगत्याचे ठरते. मग, जगाकडे बघण्याचा चष्मा जरी बदलता आला नाही तरी त्याच्या काचा वारंवार पुसून घेण्याचे भान राखावे लागते. नवचिंतनाचे माहात्म्य आहे ते नेमके याचसाठी. वरकरणी अचल वाटणाऱ्या भौतिक जगातील नवतेचा अंश अचूकपणे टिपण्यासाठी चिंतनाची कास धरून ठेवावीच लागते. मग चिंत्य विषय धर्माच्या प्रांगणातील असो वा विज्ञानाच्या. नवतेच्या चिंतनाला आणि चिंतनातील नवतेला कुंपणांचा काच जाचता कामा नये, हाच 'अर्थबोधपत्रिके'च्या या अंकातील लेखांचा सारभूत सांगावा आहे.

# वाचकांचा प्रतिसाद

'अर्थबोधपत्रिके'चा ऑगस्ट २००६ चा अंक चित्तवेधक आहे. 'माणसाची गोष्ट' हा लेख माहितीपूर्ण झाला असून जिज्ञासू वाचकांकरिता या विषयावरील संदर्भ ग्रंथांची सूची दिल्यास अधिक अभ्यासासाठी त्याचा उपयोग होईल. *वृद्धत्व : 'समस्या' की 'विषय'* ? हा लेखही चिंतनीय व मननीय आहे. वृद्धत्वाची मानसिक (व आर्थिक) तरतूद तरुणपणात करणे आवश्यक आहे, हे सूत्र ध्यानात ठेवले तर 'समस्या' आणि 'विषय' यांतील अंतर नाहीसे होईल. या व्यतिरिक्त *'क्लोनिंगचे स्वप्न विरले ?'* व *'रशियाचे तैलास्त्र'* या लेखांमुळे हा अंक संग्राह्य झाला आहे.

**श्रीनिवास अ. जोशी, पुणे**

'अर्थबोधपत्रिके'चा मी वर्गणीदार-वाचक आहे. वाढत्या वयानुसार ग्रंथालयांमध्ये वारंवार जाणे होत नसल्याने गहन विषयांवरील भारदस्त ग्रंथ व मासिके बघणे शक्य होत नाही. अशा वेळी 'अर्थबोधपत्रिका' व इंटरनेट हे उपयोगी ठरतात. दुधाची तहान ताकाने भागवितात. या मासिकातील (ऑगस्ट २००६) *वृद्धत्व 'समस्या' की 'विषय'* ? हा ऊहापोह मजेचा वाटला. एक मजेशीर विचार असा सुचला की भारताच्या लोकसंख्येत मुस्लिमांची व ज्येष्ठ नागरिकांची टक्केवारी जवळपास सारखीच. मग आमचे प्रश्न हाताळले जावेत म्हणून आमची 'लॉबी' का बनत नाही ? आम्हाला 'व्होटबँक'चा दर्जा का प्राप्त होत नाही ? असो. पत्रिकेची उपयुक्तता वाढविण्याच्या दृष्टीने संदर्भासाठी वापरलेल्या संकेतस्थळांचा उल्लेख आपण करावा, असे वाटते. **अ.दा. भोगले, बेंगळूर**

'अर्थबोधपत्रिका' या मासिकाचे सध्याचे स्वरूप उत्तम आहे. मध्यंतरी अर्थविश्वात प्रचलित शब्दांचे अर्थ सांगणारा उत्तम लेख होता. अर्थविज्ञानासंदर्भात किमान एकतरी लेख दरमहा असावा असे वाटते. भारतीय अर्थविज्ञानाविषयी जर लेख प्रसिद्ध करता आला तर उत्तमच. 'अर्थबोधपत्रिके'त आपण जो सामाजिक,

(पृष्ठ ३६ वर पाहावे)

**<u>टीप</u> : 'अर्थबोधपत्रिके'तील विविध लेखांसाठी संदर्भ म्हणून वापरलेल्या संकेतस्थळांचा व इतर साहित्याचा तपशील पृष्ठ क्रमांक ३७ वर स्वतंत्रपणे देण्यात आला आहे.**

# जिहाद की इज्‌तिहाद ?

एकविसाव्या शतकात प्रवेश केलेल्या जगाला हादरविणारी घटना ११ सप्टेंबर २००१ रोजी घडली. अमेरिकेविरुद्ध तथाकथित 'जिहाद' पुकारलेल्या दहशतवाद्यांच्या हल्ल्यात 'वर्ल्ड ट्रेड सेंटर'च्या उत्तुंग इमारती जमीनदोस्त झाल्या आणि सुमारे अडीच हजारांवर नागरिक ठार झाले. ही घटना व त्या संदर्भातील बाबी इतिहासजमा झाल्या. मात्र दहशतवाद्यांचा तथाकथित 'जिहाद' आजही चालूच आहे. विशेषतः, इंडोनेशिया, ब्रिटन, भारत या देशांमधील बॉंबस्फोटांच्या घटना जगाला 'जिहाद'ची आठवण करून देत आहेत. या घटनांमुळे अनेक देशांमधील विविध समाजगट अस्वस्थ होणे हे स्वाभाविकच आहे. पण सगळ्यात महत्त्वाचे असे की, अमेरिका-युरोपपासून भारत, इंडोनेशिया, मलेशिया अशा अनेक देशांमध्ये पसरलेला मुस्लिम समाजही या तथाकथित 'जिहाद'मुळे बराच अस्वस्थ झालेला आहे. शिवाय, फ्रान्समधील मुस्लिम तरुणींनी हिजब घालण्यावरून उठलेले वादळ, अलीकडेच तिथे झालेल्या दंगली आणि पैगंबरांच्या व्यंगचित्रांवरून जगभर झालेला हिंसाचार अशा सामाजिक घटनांनीही त्यात भर घातली आहे. अशा घटना घडल्या की 'सुरक्षा' नामक बाबीमुळे मुस्लिम समाजाचे दैनंदिन जीवनव्यवहार अडचणीत येतातच, शिवाय 'मुस्लिम' म्हणूनही ते मागे खेचले जातात व इतर समाजापासून दुरावतात. हा अस्वस्थ मुस्लिम समाज सश्रद्ध आहे. अल्ला, कुरआन (यातील आयती म्हणजे वचने - अल्लाने जिब्राईलद्वारा मुहंमद पैगंबरांना सांगितली) व हदीस (मुहमंद पैगंबर यांची वचने) यांवर त्याचा विश्वास आहे. पण त्याचबरोबर जगातील आर्थिक, सामाजिक-सांस्कृतिक व राजकीय बदलांना तसेच विज्ञान-तंत्रज्ञानाला आपलेसे करीत प्रगतीपथावर जाण्याची कास धरणाराही हा समाज आहे. त्यामुळे तो एका पेचात सापडला आहे. या पेचातून बाहेर पडण्याचा मार्ग या समाजातील विचारवंत शोधत असून तो आहे 'इज्‌तिहाद'चा (Ijtihad).

**'इज्‌तिहाद' म्हणजे....**

तर्कशुद्ध विचार (logical, creative thinking) करण्यासाठी केलेली प्रयत्नांची पराकाष्ठा म्हणजे 'इज्‌तिहाद'. कुरआन व हदीस यांच्या आधारे बदलत्या काळाशी

सुसंवादी अशा पद्धतीने इस्लामचे आकलन करून घेण्याची प्रक्रिया म्हणजे 'इज्तिहाद'. विशेषत: कुरआन व हदीसमध्ये नसलेल्या बाबीसंदर्भात निर्णय घेताना 'इज्तिहाद'चा उपयोग करता येतो. यामुळेच इस्लाममध्ये लवचिकता असून मुस्लिम समाजाला बदलणाऱ्या सामाजिक परिस्थितीला सामोरे जाता येते, असे अभ्यासक म्हणतात. त्यांच्या मते प्रेषित मुहम्मद पैगंबर यांच्या काळापासून 'इज्तिहाद'ला मान्यता आहे. या संदर्भात पैगंबर व त्यांचे एक सहयोगी हजरत मुआज बिन जबल यांच्यात झालेल्या प्रश्नोत्तरांचा दाखला दिला जातो :-

*प्रेषित : "तू राज्यकारभार कशाप्रकारे करशील ?"*

*मुआज : "मी कुरआननुसार राज्यकारभार करीन."*

*प्रेषित : "समजा एखाद्या बाबीसंदर्भात कुरआनमध्ये मार्गदर्शन नसेल तर ...?"*

*मुआज : "....मग मी हदीसचा/सुन्नाहांचा आधार घेईन."*

*प्रेषित : "समजा सुन्नाहांमध्येही त्याचे उत्तर सापडले नाही तर....?"*

*मुआज : "...मग मी इज्तिहाद करीन आणि माझ्या सद्सद्विवेकबुद्धीनुसार त्या समस्येवर तोडगा शोधून काढीन."*

इस्लाममध्ये काही बाबी - उदाहरणार्थ - अल्ला, कुरआन व हदीस यांवर विश्वास ठेवणे, नमाज पढणे, रोजे पाळणे (महिनाभर उपवास करणे) यांसारख्या काही बाबी या अपरिवर्तनीय (immutable) आहेत; तर, माणसामाणसांमधील व्यवहार आणि सामाजिक संबंध सुरळितपणे पार पाडण्यासाठी असलेले कायदे अशा काही बाबी परिवर्तनीय (mutable) मानल्या गेल्या आहेत (मुळात इस्लाम हा जीवनव्यवहार शिकविणारा धर्म आहे). या परिवर्तनीय बाबींना 'मुआमलात' असे म्हणतात. समाजातील बदलांना सामावून घेण्यासाठी 'इज्तिहाद'ची प्रक्रिया या परिवर्तनीय बाबींसंदर्भात घडून यावी, असेच बहुतांश अभ्यासकांना अपेक्षित आहे (इतिहासकालीन अभ्यासकांनाही हेच अपेक्षित होते). अलीकडच्या काळाचा विचार करता, मुस्लिमांना पाश्चात्य धर्तीचा पेहराव करण्याची आणि ज्यूंनी तयार केलेला मांसाहार खाण्याची मुभा असणे, आधुनिक बँकिंगचा विचार करता व्याज न घेता (कारण इस्लामला व्याज मंजूर नाही) बँकिंग सेवेचा लाभ घेता येणे, परदेशांत स्थायिक झालेल्या मुस्लिमांना घर विकत घेण्यासाठी काही वस्तू गहाण ठेवता येणे, ही 'इज्तिहाद'ची काही उदाहरणे. गंमत म्हणजे 'इज्तिहाद'चे व 'जिहाद'चे मूळ 'जहद' किंवा 'जुह्द' या एकाच शब्दात आहे. 'जुह्द' चा अर्थ प्रयत्नांची पराकाष्ठा, क्षमता, शक्ती असा आहे. पण एवढे

एकच साधर्म्य सोडले तर 'इर्ज्तिहाद'चा व 'जिहाद'चा काहीच संबंध नाही. साधारणपणे 'जिहाद'चा अर्थ म्हणजे 'अल्लावर श्रद्धा न ठेवणाऱ्यांविरुद्ध सशस्त्र संघर्ष' असा घेतला जात असला तरी तो उचित नाही. दरवेळी त्याचा तोच अर्थ असतो असे नाही. भारतभूमीवर फक्त दोन वेळा 'जिहाद' या शब्दाचा सर्वसामान्यपणे प्रयोग करण्यात आल्याचे आढळते. प्रथम जेव्हा टिपू सुलतानने १७९९ मध्ये इंग्रजांविरुद्ध लढताना वीरगती प्राप्त केली ती लढाई व दुसऱ्या वेळी सैय्यद अहमद शहीद रायबरेलवी (मृत्यू. इ.स. १८२०) यांनी ब्रिटिशांविरुद्ध उभारलेल्या सशस्त्र चळवळीच्या काळातील लढाईला 'जिहाद' म्हटले गेले. यापेक्षा 'महान जिहाद' (जिहादे अकबर) म्हणजे व्यक्तीने स्वत:मधील दुष्ट प्रवृत्तींविरुद्ध लढणे (लढण्याचा प्रयत्न करणे), मनावर व वासनांवर ताबा मिळविणे हा असून तो अधिक महत्त्वाचा असतो. आता एकविसाव्या शतकात इस्लामचा नव्याने अर्थ लावण्याची गरज निर्माण झाली असून त्यासाठी 'इज्तिहाद' या संकल्पनेचे पुनरुज्जीवन केले पाहिजे, असे मत अनेक देशांमधील इस्लामचे अभ्यासक व्यक्त करीत आहेत.

'इज्तिहाद'ची अंमलबजावणी करणारी व्यक्ती धर्माची अभ्यासक, समाजजीवनात मान्यता मिळविलेली व बदलत्या वास्तवाचे भान राखणारी असावी, असे मानले जाते. या व्यक्तीला 'मुज्तहिद' असे संबोधले जाते. इस्लाम धर्माच्या स्थापनेपासून (इसवीसन ६१०) 'इज्तिहाद' ची प्रक्रिया चालू होती. आठव्या शतकात त्याकडे एक कायदेशीर साधन म्हणून बघितले गेले. दहाव्या शतकात 'इज्तिहाद'चे दरवाजे बंद करण्यात आले, असे म्हटले जाते. याचा अर्थ काहींनी असा घेतला की 'इज्तिहाद'वर बंदी घालण्यात आली. पण त्या काळात 'इज्तिहाद'चा मार्ग पूर्णपणे बंद झाला होता किंवा कसे याचा पुरावा उपलब्ध नाही. तसेच मुळातच हा मार्ग बंद झाला होता की नव्हता, यावरही अभ्यासकांचे एकमत नाही. उलट 'इज्तिहाद'चे अवलंबन इतिहासात सततच झालेले आहे, असे मात्र दिसून येते.

इस्लाममध्ये शिया व सुन्नी असे दोन पंथ असून सुन्नी पंथाच्या मते इस्लामच्या कायद्याचा म्हणजे फिक़हचा (Fiqh)/शरियाचा (Sharia) पाया कुराण, हदीस, कयास /कियास (qiyas - analogy - दोन गोष्टींमधील सारखेपणा) आणि इज़्मा (consensus - समाजाची सहमती) हा आहे. याचाच विस्तार (extrapolation) होऊन काही विशिष्ट घटनांमध्ये 'इज्तिहाद'ची प्रक्रिया वापरली जाते. शिया व सुन्नी या दोन्ही पंथातील काही अभ्यासकांच्या मते 'इज्तिहाद'चा कालखंड संपलेला आहे; तर,

इराणमधील शिया गटाच्या मते 'इर्ज्तिहाद' ही सतत चालू राहणारी व अटळ प्रक्रिया असून समाजजीवनात ती सतत विकास घडवून आणत असते. या काळातील अमेरिकेतील अभ्यासक मुनीर फरीद यांनी 'इर्ज्तिहाद'विषयक काही वेगळी मते मांडली आहेत. त्यांच्या मते 'इर्ज्तिहाद'चा विचार तीन दृष्टिकोणांद्वारे करता येतो. (१) कायदेशीर साधन (२) कायदेशीर तार्किकतेची एक पद्धत (३) सृजनशील प्रेरणा वा ऊर्मी (creative impulse). 'इज्तिहाद' म्हटल्यानंतर यांतील नेमका कोणता दृष्टिकोण स्वीकारणे अपेक्षित आहे, याबाबत इस्लामच्या अभ्यासकांच्या मनांत स्पष्टता हवी. इस्लाम हा प्रत्यक्ष अल्लाने सांगितलेला धर्म असल्याने त्यात तर्क लढविण्याचे, सृजनशील प्रेरणेचे 'इज्तिहाद' हे एकमेव साधन आहे. म्हणून अलीकडच्या काळात 'इज्तिहाद'कडे अनेकांचे लक्ष वेधले गेले आहे, असे ते म्हणतात.

## इतिहासातील 'इज्तिहाद'

इस्लामच्या इतिहासात 'इज्तिहाद'चा प्रसार दोन टप्प्यांत झालेला दिसतो. पहिल्या टप्प्यात म्हणजे आठव्या-नवव्या शतकात त्याचा उपयोग कायदेशीर बाबींच्या संदर्भात करण्यात आला. या काळात इस्लामचा प्रचार, प्रसार चालू होता. त्यामुळे वेगवेगळ्या घटनांसदर्भात इस्लामच्या कायद्याची अंमलबजावणी करताना कोणावर अन्याय होऊ नये यासाठी त्याबाबत सुयोग्य विचारमंथन व्हावे म्हणून 'इज्तिहाद'चा वापर झाला (उदाहरणार्थ, चोरी करणाऱ्यांचे हात कापण्याची शिक्षा इस्लाममध्ये होती. पण मुहंमद पैगंबरांच्या देहावसानानंतर केवळ १५ वर्षांनीच खलिफा ओमर इब्न-अल-खताब यांनी या शिक्षेची अंमलबजावणी केली नाही; कारण, त्यांच्या असे लक्षात आले की अनेक चोरांनी केवळ उपासमार, दुष्काळ व गरिबी यांमुळे गांजल्याने चोरी केली होती, असे काही अभ्यासकांनी नोंदले आहे). मग हळूहळू इस्लामचा कायदा स्थिर झाला आणि 'इज्तिहाद'ने धार्मिक क्षेत्रात प्रवेश केला. त्यानंतर इस्लाम धर्मही स्थिरावला आणि 'इज्तिहाद'चे स्वरूप मर्यादित झाले. १० व्या शतकाच्या सुमारास या संकल्पनेवर मर्यादा येऊन ती पिछाडीवर पडली ती थेट एकोणिसाव्या शतकापर्यंत.

या दुसऱ्या टप्प्यात मात्र 'इज्तिहाद'चा उपयोग तर्कशुद्ध विचार (सृजनशील प्रेरणा) करण्यासाठी झाला. 'इज्तिहाद'चे हे पुनरुज्जीवन होण्यामागे सुधारणावादी चळवळींचा - सलफियांचा - सिंहाचा वाटा होता, असे म्हटले जाते. अठराव्या शतकात मुस्लिम समाजाचा सामाजिक व नैतिक ऱ्हास रोखण्यासाठी झालेल्या चळवळींमधील सर्वात महत्त्वाची चळवळ होती वह्हाबी. मुहंमद इब्न-अल-वह्हाब (१७०३-१७९२)

यांनी ही चळवळ स्थापन केली. यासारख्या चळवळी इतरत्रही झाल्या. भारतीय उपखंडात शाह वलीलुल्ला व सय्यद अहमद बरेलवी (१७८६-१८३१) यांनी चळवळ सुरू केली होती. धार्मिक शुद्धता, नैतिक व सामाजिक सुधारणा यांचा त्यांनी पाठपुरावा केला. या व्यक्तींपासून प्रेरणा घेऊन एकोणिसाव्या व विसाव्या शतकात काही सुधारक पुढे आले. त्यांत जमालुद्दीन अफगाणी (१८३९-१८९७) आणि मुहंमद अब्दूह (१८४९-१९०५) यांचे कार्य उल्लेखनीय म्हणता येते. या दोघांनी पॅरिसमध्ये राजाश्रय घेतला असताना सुधारणांसाठी पहिले पाऊल उचलले. त्या काळात इजिप्तमध्ये या दोघांच्या विचारसरणीचा प्रभाव पडला होता. सलफियांचे मुखपत्र असलेले 'अल-मनार' असे एक प्रकाशनही त्या काळी अस्तित्वात होते. मुहंमद अब्दूह 'मुफ्ती' झाल्यानंतर हे सुधारणावादी विचार इतरत्र पसरले.

याच काळात विज्ञानाचा उपयोग करून पाश्चिमात्य जगात वेगाने सुधारणा घडून येऊ लागल्या होत्या. मुस्लिम समाज या बदलत्या घडामोडींपासून अलग पडू नये म्हणून या दोघांनी भरपूर प्रयत्न केले. त्यांत इस्लामने धर्मनिरपेक्ष भौतिकवादाला (secular materialism) मान्यता देणे, डार्विनच्या उत्क्रांतीवादाला अनुकूलता दर्शविणे, कुरआनला अनुसरून विज्ञानाला महत्त्व देणे, यांचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल. इस्लाममध्ये पहिली स्त्री-वादी चळवळ याच काळात घडली. बदलता काळ लक्षात घेऊन शिक्षणात सुधारणा घडविण्याचे मोठे कामही या चळवळीने केले. याचा फार मोठा प्रभाव अल्जिरिया, मोरोक्को, ट्यूनिशिया, सीरिया, इंडोनेशिया व भारत येथील व्यक्तींवर पडला. यापासून स्फूर्ती घेऊनच इंडोनेशियात सुधारणावादी मुहम्मदीया चळवळ आकाराला आली; तर, इजिप्तमध्ये हसन अल-बन्ना या भावंडांनी हे कार्य पुढे नेले. सर सय्यद अहमद खान (१८१७-१८९८) यांनी भारतातील मुस्लिम समाजात सुधारणा घडून येण्यासाठी अलीगड मुस्लिम विद्यापीठाची स्थापना केली. मुस्लिम समाजात सुधारणा घडून येण्यासाठीच भारतीय उपखंडात अबुलआला मौदुदी (१९०३-१९७९) यांनी 'जमात-ए-इस्लामी'ची स्थापना केली होती, हे येथे उल्लेखनीय ठरावे. मात्र धर्मपंडितांनी त्यांच्या या 'इज्तिहाद'ला मान्यता न दिल्याने प्रगतीचा हा मार्ग खुंटला, असे म्हटले जाते.

नव्या शतकात, विज्ञान-तंत्रज्ञानाच्या मदतीने प्रगतीचा एकेक मैलाचा दगड पार करणाऱ्या या विज्ञाननिष्ठ समाजात, इस्लाम मानणाऱ्या सश्रद्ध 'विश्वनागरिकां'साठी, 'इज्तिहाद'चा तिसरा टप्पा सुरू व्हावा, अशी अभ्यासकांची अपेक्षा आहे. ✿✿

# नव्या जगातील इज्‌तिहादकडे.....

या शतकात, दहशतवाद्यांनी तथाकथित 'जिहाद' पुकारल्याच्या पार्श्वभूमीवर 'इज्‌तिहाद' या संकल्पनेचे पुनरुज्जीवन होऊन तिचा वापर सार्वत्रिक व्हावा यासाठी मुस्लिम विचारवंतांमध्ये चर्चा झडत आहेत. म्हणजे यापूर्वीच्या लेखात नमूद केलेल्या दोन टप्प्यांनंतर 'इज्‌तिहाद' आता तिसरा टप्प्यात प्रवेश करतो आहे, असे म्हणता येईल. हा टप्पा सुरूहोण्यासाठी आणखीही एक महत्त्वाची घटना घडली. ती म्हणजे अमेरिकेतील एक अभ्यासक सॅम्युअल हंटिंग्टन यांनी भविष्यकाळात संस्कृतींचा संघर्ष होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे मत *'द क्लॅश ऑफ सिव्हिलायझेशन्स' (पेंग्विन बुक्स १९९६)* या पुस्तकात मांडले. पण अनेकांनी असा संघर्ष घडणार नाही, घडू नये असे मत त्यावर मांडले. मग संघर्ष टाळायचा असेल तर विविध धर्मसंस्कृतींमध्ये सौहार्दपूर्ण संबंध कसे प्रस्थापित करता येतील, या दिशेने विचार करण्यात येऊ लागला. या दिशेकडे जाताना 'इज्‌तिहाद' या संकल्पनेचे महत्त्व अनेकांच्या ध्यानी आले. 'इज्‌तिहाद' कसा घडतो, बदलत्या सामाजिक परिस्थितीत इस्लामचे नव्याने आकलन करण्यासाठी 'इज्‌तिहाद'चे पुनरुज्जीवन कसे करायचे, ही संकल्पना उपयोगात आणण्याचे अधिकार कोणाला द्यायचे, त्यात कोणकोणते विषय यावेत, त्यात जगभरातील, विशेषतः, अमेरिकेतील इस्लामच्या अभ्यासकांची भूमिका काय असावी, सामाजिक न्याय व समानता या बाबींना प्राधान्य देऊन इस्लामने बदलत्या सामाजिक परिस्थितीला कसे सामोरे जावे, अशा मूलभूत प्रश्नांचा ऊहापोह आता करण्यात येत आहे.

**'इज्‌तिहाद' कोणी करायचा ?**

'इस्लामिक लॉ कौन्सिल ऑफ नॉर्थ अमेरिके'चे एक सदस्य व कॅलिफोर्निया आणि चॅपमन विद्यापीठांतील प्राध्यापक मुज़मिल सिद्दिकी यांच्या मते 'इज्‌तिहाद'साठी 'मुज्‌तहिदां'चे कार्य महत्त्वाचे ठरेल. याचे कारण स्पष्ट करताना ते म्हणतात की कुरआन व हदीस या दोहोंमधील वचने चार प्रकारांत विभागली जातात : (१) नेमका संदर्भ व नेमका अर्थ (२) नेमका संदर्भ व संभाव्य अर्थ (३) संभाव्य संदर्भ व नेमका अर्थ (४) संभाव्य संदर्भ व संभाव्य अर्थ. 'इज्‌तिहाद' करणाऱ्या 'मुज्‌तहिदां'ची प्रमुख जबाबदारी म्हणजे या संदर्भांची विश्वसनीयता तपासणे ही होय. मग त्यांनी तीन

प्रकारे समाजाचे प्रबोधन करणे गरजेचे आहे - (१) या वचनांचा अर्थ लक्षात घेऊन तसे कायदे शोधणे (२) या कायद्यांचा परीघ विस्तारून जुन्या काळातील तशाच प्रकारच्या काही घटनांचा (कयास) शोध घेणे (३) समाजाचे व्यापक हित लक्षात घेऊन वर उल्लेखित दोन्ही प्रकारांत न बसणाऱ्या नव्या घटनांना, सर्वसामान्य तत्त्वांच्या आधारे व शरियातील उद्दिष्टांनुसार कायद्याच्या कक्षेत आणणे. याला 'इस्‌तिहसान' (istihsan) किंवा 'इस्‌तिसलाह' (istislah) असे म्हटले जाते.

'इज्‌तिहाद'चा उपयोग करण्याचा अधिकार कुरआन व हदीस यांचा मूळ संदर्भ पाहून मग त्याचा सखोल अभ्यास करणाऱ्या व्यक्तीकडे ('मुज्‌तहिद') जात असला तरी या काळात तेवढेच पुरेसे नाही, असे मत डेट्रॉइट येथील 'इस्लामिक सेंटर ऑफ अमेरिके'चे संचालक इमाम हसन कझ्‌विनी यांनी मांडले आहे. इस्लामच्या कायद्याचे अधिकारक्षेत्र, हदीस सांगणाऱ्या व्यक्तींचे चरित्र तसेच कुरआनसंदर्भातील विवेचन, अरेबिक भाषेचा सखोल अभ्यास व भाषेवर प्रभुत्व आणि तर्कशास्त्र या बाबी त्या व्यक्तीने माहिती करून घेतलेल्या असणे हे अपेक्षित आहेच, पण त्याचबरोबर या नव्या शतकात तत्त्वज्ञान, अर्थशास्त्र आणि समाजशास्त्र या विषयांचेही ज्ञान त्याला असणे गरजेचे आहे. शिवाय, 'मुज्‌तहिद' या व्यक्तीच्या ठायी नैतिकता व धर्मनिष्ठा असणे अत्यंत गरजेचे आहे, असेही कझ्‌विनी स्पष्ट करतात. 'मुज्‌तहिदां'ची संख्या व त्यांचे अधिकारक्षेत्र यांत वाढ करण्यासाठी सध्या काही अडचणी आहेत, असे प्राध्यापक सिद्दिकी म्हणतात. उदाहरणार्थ, कुरआन व हदीस यांचे अनेक अभ्यासक इस्लाम धर्मात आहेत, पण त्यांतील आयतींचा, वचनांचा योग्य अर्थ लावण्यासाठी आवश्यक असणारे भाषाशास्त्र, तर्कशास्त्र व समाजशास्त्र यांचा अभ्यास त्यांनी केलेला असतोच असे नाही. शिवाय अशा अभ्यासू व्यक्तींना माहितीचा शोध घेता येऊन त्यांनी काही विषयांवर चर्चा-वादविवाद घडवून आणावेत असे स्वातंत्र्य काही मुस्लिम समाजात त्यांना असतेच असे नाही. या व्यक्तींवर राजकीय तसेच धार्मिक गटांकडून बंधने येऊ शकतात. त्यात आणखी भर पडू शकते ती इस्लामिक शिक्षण पद्धतीत सुधारणा न झाल्याची. त्यामुळे या समाजामध्ये विचारमंथनासाठी 'मुज्‌तहिद' तयार होण्याच्या दृष्टीने विशेष प्रयत्न व्हायला हवेत, असेही त्यांना वाटते.

### 'इज्‌तिहाद'च्या तिसऱ्या टप्प्यासाठी....

'इज्‌तिहाद'ची दारे बंद करणे ही चूक मुस्लिमांकडून झाली, असे मत कझ्‌विनी यांनी मांडले आहे. अब्बासिदांच्या कारकिर्दीत (इसवीसन ७५०-१२५८) कुरआन व

हदीस समजून घेण्याचे अधिकार मुस्लिम समाजाने काही मोजक्याच व्यक्तींना दिले. अर्थात त्यामागे राजकीय हेतू होतेच. या अब्बासिदांनी प्रार्थना व धर्मविषयक बाबी आणि राजकीय व्यवहार हे सर्व आपल्या हाती एकवटले. त्यामुळे नवविचारांची दिशा बंद होऊन मुस्लिम समाजाला कुंठितावस्था प्राप्त झाली. आजही अनेक मुस्लिम देशांमधील सरकारे आपल्या राजकीय हेतूंसाठी 'इज्तिहाद'चा मार्ग खुलाच होऊ देत नाहीत. एकीकडे, धार्मिक संस्थांवर सरकारचे नियंत्रण असावे असे त्यांना वाटते; तर दुसरीकडे, धार्मिक संस्था, सरकारकडून मिळणाऱ्या निधींवर अवलंबून असल्याने त्यांनाही सरकारी धोरणे मान्य करणे भाग पडते. या परिस्थितीत धार्मिक संस्था व सरकारे यांचा परस्परसंबंध संपुष्टात आणणे, हे 'इज्तिहाद'च्या दिशेने उचललेले पहिले पाऊल ठरते. असे झाल्यासच धार्मिक संस्था स्वतंत्रपणे धार्मिक व कायदेशीर बाबींचा अर्थ लावू शकतात, असे कझ्विनी स्पष्ट करतात.

इस्लामच्या अभ्यासकांना आपली मते मोकळेपणाने मांडण्याचे व इतर अभ्यासकांना त्याबाबतची चर्चा करण्याचे स्वातंत्र्य मिळत नाही तोपर्यंत खरा 'इज्तिहाद' साधला जाऊ शकत नाही, या बाबीकडे प्राध्यापक सिद्दिकी यांनी लक्ष वेधले आहे. 'इज्तिहाद' साठी अभिव्यक्ती स्वातंत्र्य अत्यावश्यक असून त्यासाठी मुस्लिम देशांमध्ये लोकशाही रुजणे ही सर्वात प्राधान्याची गोष्ट ठरते, असेही त्यांना वाटते. मुस्लिम विद्यार्थ्यांना शिकविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमात बदल करणे ही देखील 'इज्तिहाद' साठी एक आवश्यक बाब आहे, असे सिद्दिकी म्हणतात. एका धर्माशी संबंधित व्यवहार शिकविण्याबरोबर विविध धर्मशास्त्रे, त्यांतील मतमतांतरे तसेच आधुनिक काळातील तर्कशास्त्र, तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, इतिहास, विज्ञान, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र अशा अनेक विषयांचा समावेश त्यांच्या अभ्यासक्रमात व्हावा असे ते स्पष्ट करतात. याशिवाय 'इज्तिहाद' हा एक सामूहिक प्रयत्न - म्हणजे विविध मुस्लिम देशांमधील धर्मपंडितांसह वैद्यक, अभियांत्रिकी, खगोलशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, कायदेशास्त्र अशा अनेकानेक क्षेत्रांत कार्य करणाऱ्या मुस्लिम विचारवंतांनी चर्चेद्वारे 'इज्तिहाद' सातत्यशील राखणे - असे घडायला हवे आहे. इस्लामच्या मुस्लिमेतर अभ्यासकांनाही 'इज्तिहाद'च्या प्रक्रियेत सहभागी करून घेण्यात यावे असेही त्यांचे मत आहे.

### 'इज्तिहाद'चे विषय

मुस्लिम समाजासमोर आज असलेल्या काही प्रश्नांसाठी 'इज्तिहाद'ची गरज असली तरी त्यातही खालील विषयांबाबत 'इज्तिहाद' तातडीने घडावा, असे

अभ्यासकांना वाटते - *(१) बदलत्या काळातील स्त्रियांची भूमिका* - स्त्रियांच्या शिक्षणाला व विकासाला वेग येण्यासाठी *(२) सुन्नी व शिया यांच्यातील परस्परसंबंध* - संपूर्ण मुस्लिम समाजाच्या प्रगतीचा विचार करता इस्लाममधील या दोन पंथांमध्ये फार मोठे वैचारिक मतभेद असणे उपयोगाचे नाही. दोन्ही पंथांची सुधारणांची दिशा एकच असण्याठी *(३) जागतिकीकरण* - इस्लामच्या परंपरेनुसार जगाची विभागणी 'इस्लामचे जग' (darul Islam) व 'इस्लामेतर जग' (darul Harb) अशी करण्यात आली आहे. पण आता जागतिकीकरणात जग जवळ येत असताना 'मुस्लिम' हा 'विश्वनागरिक' असणे अपेक्षित आहे. संस्कृतींच्या संघर्षाची शक्यता टाळण्यासाठी या 'विश्वनागरिका'ला स्वतःची ओळख जपूनही वेगवेगळ्या संस्कृतींबरोबर, समाजघटकांबरोबर सौहार्दपूर्ण वातावरणात राहता यावे यासाठी (बहुसांस्कृतिकतेसाठी) *(४) मुस्लिमेतर देशांमधील मुस्लिम* - अल्पसंख्याक समाज म्हणून राहात असलेल्या नागरिकांना त्या देशाचे

## टर्की व इराणमधील अनौपचारिक 'इज्तिहाद'

●टर्की हे मुस्लिम जगतातील पहिले धर्मनिरपेक्ष राष्ट्र ●बहुसंख्य नागरिक इस्लामधर्मीय (सुन्नी) असूनही शरियाची अंमलबजावणी न करता युरोपीय कायद्याच्या आधारे तयार केलेल्या धर्मनिरपेक्ष कायद्याची अंमलबजावणी ●अरेबिक लिपीऐवजी लॅटिन लिपीला मान्यता ● युरोपियन धर्तीची टोपी पुरुषांनी घालण्याचा दंडक ●स्त्रियांच्या हिजबवर (डोक्याला बांधायचा मोठा रुमाल) बंदी ●अभिव्यक्ती स्वातंत्र्य (पण अलीकडे वादग्रस्त ठरलेले)

●इराणमध्ये सुधारणावादी सरकारकडून (रेझा पहेलवी यांच्या काळात) १९६७ मध्ये पहिले कुटुंबनियोजनाचे धोरण जाहीर ●कुटुंबनियोजनाला मानवाधिकार म्हणून मान्यता ●स्त्रियांच्या दृष्टिकोणातून घटस्फोटविषयक कायद्यात दुरुस्ती ●स्त्रियांना नोकऱ्या करण्यास प्रोत्साहन ● क्रांतीच्या काळात (१९७९ -अयातुल्ला खोमेनींची कारकीर्द) कुटुंबनियोजनाचे धोरण पिछाडीवर पण १९८९मध्ये खोमेनींकडूनच पुन्हा एकदा कुटुंबनियोजनाला प्राधान्य ●विवाहाच्या नोंदणीचा दाखला मिळण्याआधी पति-पत्नीने कुटुंबनियोजनाचे मार्गदर्शन घेणे बंधनकारक

जबाबदार नागरिक व मुस्लिम म्हणून राहायचे असताना त्यांच्या सुयोग्य मार्गदर्शनासाठी

*(५) अर्थव्यवहार* - नव्या जगाची नवी अर्थव्यवस्था समजावून घेऊन इस्लामने मान्य केलेल्या आर्थिक व्यवहारांमध्ये बदल घडविण्याचे काम 'इज्तिहाद'द्वारे घडावे यासाठी

*(६) मुस्लिम देशांमधील एकी* - संपूर्ण मुस्लिम समाजात सुधारणा घडून येण्यासाठी मुस्लिम देशांमध्ये सहकार्य असणे तसेच तेथील इतर धार्मिक अल्पसंख्याक समाजाचे स्वातंत्र्य जपले जावे यासाठी.

'इज्तिहाद' ही संकल्पना इतरही काही अभ्यासकांनी उचलून धरली आहे. त्यात प्रामुख्याने अमेरिकेतील मॅसेच्युसेटस् विद्यापीठात रोबोटिक्स या विषयात उच्चशिक्षण घेतलेले व ते करियर सोडून 'इज्तिहाद'साठी प्रयत्न करणारे डॉ. रिज़्वान मसमौदी, आंतरराष्ट्रीय संबंधांचे अभ्यासक डॉ. मुक्तदर खान, मशिदीतील अमेरिकाविरोधी वक्तव्याला आक्षेप घेतल्याने तसेच हदीसमधील वचनांचा मूळ संदर्भ शोधणे शक्य नसल्याने ती आता बाजूला ठेवण्याची गरज असल्याचे परखड मत मांडल्याने इजिप्तमधून पलायन करावे लागलेले व अमेरिकेत आश्रय घेतलेले अभ्यासक अहमद मन्सूर, सुधारणावादी असल्याने दक्षिण आफ्रिकेबाहेर पडलेले व सध्या अमेरिकेत वास्तव्यास असलेले ड्यूक विद्यापीठातील प्राध्यापक इब्राहीम मूसा, मलेशियातील कासीम अहमद अशा अनेकांचा समावेश आहे. भारतातही अलीकडे काही प्रमाणात 'इज्तिहाद'ची चर्चा सुरू झालेली आहे. मदरशांमधील शिक्षणपद्धतीत काही बदल करण्यात येत आहेत. तेथील विद्यार्थ्यांना नवनवीन विषयांची ओळख करून देण्यात येत आहे. अगदी संगणक व इंटरनेटची सुविधादेखील या विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात येत आहे. तसेच, बदलते विज्ञान व समाजजीवन लक्षात घेऊन मुस्लिम समाजासमोरील प्रश्नांची उत्तरे शोधण्यात येत आहेत.

थोडक्यात, आधुनिक काळातील विचारवंतांच्या मते मुस्लिम समाजासमोर आज उभे ठाकलेले प्रश्न सोडविण्याची किल्ली 'इज्तिहाद' ही आहे. मात्र त्यासाठी मुस्लिम समाजात वैयक्तिक तसेच सामूहिक इच्छाशक्ती आणि मुस्लिम देशांमध्ये लोकशाही यांची नितांत गरज आहे. ✿✿

---

***टीप :*** *'जिहाद की इज्तिहाद ? ' आणि 'नव्या जगातील इज्तिहादकडे' या लेखांसाठी इस्लाम धर्म-परंपरा-साहित्य यांचे व्यासंगी जाणकार लेखक, पर्शियन व उर्दू भाषेचे अभ्यासक व शिक्षणतज्ज्ञ अनीस चिश्ती यांचे विशेष सहकार्य लाभले आहे.*

राजकीय

## अमेरिकेचे अण्वस्त्रकेंद्री धोरण :

# जग विनाशाच्या दिशेने ?

"चालू शतकात अमेरिकेने अण्वस्त्रांभोवतीच फिरणाऱ्या आपल्या परराष्ट्र्विषयक धोरणांवर विसंबून राहता कामा नये; कारण, अमेरिकेने असे धोरण राबविणे हे अनैतिक, बेकायदेशीर आणि संपूर्ण जगासाठीच अतिशय धोकादायक ठरू शकते. "

"अमेरिका अण्वस्त्रांचा वापर स्वतःहून म्हणजे प्रथम कधीच करणार नाही, असे अमेरिकेने कधीच म्हटलेले नाही. किंबहुना, एका व्यक्तीच्या (राष्ट्राध्यक्षांच्या) निर्णयावर अण्वस्त्रांचा वापर करण्यासाठी अमेरिकी लष्कराची कायमच जय्यत तयारी असते."

"अण्वस्त्रसज्ज राष्ट्रांच्या विरोधात अण्वस्त्रांचा वापर करणे हे आत्मघातकी पाऊल ठरेल. तर, अण्वस्त्रे नसणाऱ्या राष्ट्रांच्या विरोधात अण्वस्त्रे वापरणे हे नैतिकदृष्ट्या निंदनीय, लष्करीदृष्ट्या अनावश्यक आणि राजकीयदृष्ट्या असमर्थनीय ठरेल."

ही विधाने आहेत जागतिक राजकारणात मान्यता मिळविलेले अमेरिकेचे एके काळचे संरक्षणमंत्री रॉबर्ट मॅकनामारा यांची. जग विनाशाकडे वाटचाल करीत असल्याच्या धोक्याची कल्पना देण्यासाठी वयाच्या ८८व्या वर्षी त्यांनी कंबर कसली आहे. संरक्षणमंत्रीपद सोडल्यानंतर मॅकनामारा यांनी जागतिक बँकेचे अध्यक्षपद स्वीकारले. प्रथम संरक्षणमंत्रीपदाची जबाबदारी आणि त्यानंतर आंतरराष्ट्रीय बँकेच्या अध्यक्षपदाची (१९६८ ते १९८१) धुरा सांभाळल्याने अमेरिकेच्या परराष्ट्रधोरणावर जाहीरपणे मत मांडण्याची त्यांना परवानगी नव्हती. त्यामुळे इतकी वर्षे त्यांना त्यांचे विचार प्रकट करता आले नाहीत. आता ते सार्वजनिक कार्यात, अण्वस्त्रांच्या विरोधात सक्रिय झाले आहेत. मॅकनामारा व त्यांच्या सहकाऱ्यांनी तत्कालीन केनेडी प्रशासनाला क्यूबातील संघर्षाच्या वेळी (१९६२) अण्वस्त्रांचे संकट टाळण्यासाठी मदत केली होती. मात्र चालू शतकातील अण्वस्त्रविषयक घडामोडींनी मॅकनामारा चिंतित झाले आहेत. कारण, जग अणुयुद्धाच्या दिशेने वाटचाल करीत असल्याचे त्यांना जाणवत आहे. तसेच अण्वस्त्रसज्ज राष्ट्रांकडून अपघाताने किंवा अनवधनाने अण्वस्त्रांचा वापर होण्याचा धोकाही फार मोठा आहे, हेही त्यांना माहिती आहे. मॅकनामारा यांच्याप्रमाणे अमेरिकेचे माजी संरक्षणमंत्री विलियम पेरी (माजी राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन यांचे सहकारी)

यांनीदेखील जगाला अण्वस्त्रांपासून धोका आहे, असे मत व्यक्त केले होते. अमेरिकेच्या भूमीवर अण्वस्त्रांचा भडका उडण्याची शक्यता ५० टक्के आहे, असेही त्यांनी म्हटले होते. अमेरिकेसारख्या बलाढ्य राष्ट्राचे दोन माजी संरक्षणमंत्री अणुयुद्धाच्या चिंतेने का बरे ग्रस्त झाले आहेत ?

अलीकडे, अमेरिकेच्या लष्करविषयक धोरणांत अण्वस्त्रांना अग्रक्रम देण्यात आला असून आंतरराष्ट्रीय राजकारणातील ही मोठी काळजीची बाब आहे. शिवाय यामुळे आंतरराष्ट्रीय नियमांची पायमल्ली होत आहे, ती बाब वेगळीच. अमेरिकेची अण्वस्त्रविषयक धोरणे नेहमीच अशा प्रकारची राहिली असून अलीकडच्या काळात ती अधिक धोकादायक वळणाकडे गेलेली दिसतात (अमेरिकेच्या धोरणांमुळे दहशतवाद व इतर देशांमधील अण्वस्त्रांची स्पर्धा वाढीस लागली की, जगावर आपलाच अधिकार कायम राखणे आणि दहशतवादाला प्रत्युत्तर या भूमिकेतून अमेरिका अण्वस्त्रविषयक धोरणे आक्रमक बनवित आहे, हा वादाचा मुद्दा आहे). अमेरिकेच्या लष्करात सध्या सुमारे सहा हजारांवर अण्वस्त्रे असून त्यांपैकी किमान दोन हजार अण्वस्त्रे ही लष्करात तैनात आहेत व केवळ १५ मिनिटांची पूर्वसूचना मिळताच ती शत्रूवर हल्ला करू शकतात. हिरोशिमावर टाकलेल्या एका  अणुबॉंबच्या क्षमतेपेक्षा २० पट जास्त विध्वंसक क्षमता यांतील काही अण्वस्त्रांमध्ये आहे.

अमेरिकेने अणुयुद्ध करायचे ठरवले तर त्यासाठीच्या तयारीला फक्त १५ ते २० मिनिटांचा कालावधी पुरेसा आहे. अमेरिकेच्या 'स्ट्रॅटेजिक एअर कमांड'च्या कमांडरला सतत एक विशिष्ट टेलिफोन जवळ बाळगावा लागतो. सतत याचा अर्थ दिवसातील २४ तास, आठवड्यातील सातही दिवस व वर्षातील ३६५ दिवस. हा फोन अमेरिकेचे अध्यक्ष व लष्करातील काही मोजके उच्चपदस्थ अधिकारी यांच्याशी क्षणात जोडला जाईल अशी यंत्रणा आहे. हा फोन वाजल्यास तिसरी रिंग संपेपर्यंत तो कमांडरकडून उचलला गेलाच पाहिजे, असा आदेश आहे. त्या वेळी फोनवर त्याला 'शत्रूकडून अण्वस्त्रांचा वापर होण्याची शक्यता आहे,' असे सांगण्यात आले तर हा इशारा खरा आहे किंवा कसे याची चाचपणी करण्यासाठी त्याला दोन ते तीन मिनिटांचा अवधी मिळतो. जर हा इशारा खरा असेल तर अमेरिकेने उत्तरादाखल कशी हालचाल करायची याबाबत राष्ट्राध्यक्षांना गाठून त्यांना या घडामोडी सांगण्यासाठी त्याला १० मिनिटांचा अवधी असतो. संरक्षणमंत्री, सल्लागार व लष्करप्रमुखांशी चर्चा करून अध्यक्षांनी आपला निर्णय त्वरित कमांडरला सांगायचा असतो. याच वेळी कमांडरला

अण्वस्त्रांचा विशिष्ट संकेत क्रमांकही अध्यक्षांकडून मिळवायचा असतो. अध्यक्षांबरोबर असलेला लष्कराचा एक प्रमुख अधिकारी अण्वस्त्रांचा संकेतांक असलेली एक विशिष्ट

## थोडक्यात टळलेले १९६२ चे अणुयुद्ध

कॅरिबियन समुद्रातील एक छोटेसे बेट क्यूबा. तेथील फिडेल कॅस्ट्रो यांच्या नेतृत्वाखालील सरकार काही आर्थिक व राजकीय कारणांमुळे अमेरिकेच्या विरोधात उभे ठाकलेले. क्यूबाला साथ होती तत्कालीन सोविएत रशियाची. अमेरिका व रशिया दोघेही अण्वस्त्रधारी देश. अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष जॉन केनेडी यांना लष्कराच्या संयुक्त प्रमुखांनी क्यूबावर पुढील तीन दिवसांत हल्ला करण्याचे सुचविलेले. २७ ऑक्टोबर १९६२ च्या दुपारी या सूचनेवर अध्यक्ष केनेडी व त्यांच्या सहकाऱ्यांची घनघोर चर्चा. अमेरिकेच्या गुप्तचर यंत्रणेच्या (CIA) माहितीनुसार पुढील तीन दिवसांपर्यंत रशियाकडून क्यूबाला अण्वस्त्रे मिळणार नव्हती आणि अमेरिकेच्या संरक्षणविभागाला -'पेन्टॅगॉन'ला - सोविएत रशिया एवढ्या दूरच्या बेटावर लढण्यास उत्सुक असेल असे वाटत नव्हते. पण.... वस्तुस्थिती वेगळीच होती. अमेरिकेचे आक्रमण गृहीत धरूनच क्यूबा व सोविएत रशियाचे धोरण ठरलेले होते व त्यानुसार क्यूबाच्या भूमीवर १७० अण्वस्त्रे केव्हाच तैनात झालेली होती. म्हणजे अमेरिकेच्या आक्रमणाची चाहुल लागताच सुरू होणारे युद्ध हे अणुयुद्ध ठरले असते (असा आत्मघातकी निर्णय घेण्याची कॅस्ट्रो यांची तयारीही होती. कारण या घटनेनंतर बऱ्याच वर्षांनी मॅकनामारा व कॅस्ट्रो यांची भेट झाली तेव्हा कॅस्ट्रो यांनी तशी कबुली दिली व अमेरिकेवर असे आक्रमण झाले असते तर अमेरिकेनेही अशीच पावले उचलली असती, असे ठाम मतही व्यक्त केले). पण तसे घडले नाही आणि अणुयुद्ध टळले. ही गोष्ट एवढ्यावर संपत नाही. कारण, शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर यासंबंधीचा उघडकीस आलेला तपशील थरकाप उडविणारा आहे. अमेरिकी नौदलाच्या बोटींचा माग ठेवणाऱ्या सोविएत रशियाच्या चार पाणबुड्या तेव्हा कॅरिबियन समुद्रात होत्या. त्यांच्या सबकमांडरजवळ टॉर्पिडो (पाणबुड्यांतील अण्वस्त्रे) होते व त्यांचा वापर करण्याचे अधिकारही! सोविएत रशियाने क्यूबातून अण्वस्त्रे माघारी घेण्याचा निर्णय घेतल्यानंतरही पुढील चार दिवस या पाणबुड्यांची गस्त चालूच होती. कारण, सोविएत रशियाच्या मुख्य तळाशी असलेला त्यांचा संपर्कच तुटला होता. त्या चार दिवसांत एका सबकमांडरने जरी आपल्या अधिकाराचा वापर केला असता तर.....!

बॅग (सांकेतिक भाषेत या बॅगेला 'फुटबॉल' असे म्हणतात) सतत सांभाळत असतो. अध्यक्षांची परवानगी व अण्वस्त्रांचा संकेतांक मिळण्याचा अवकाश की झाली अणुयुद्धाला सुरुवात (ही सज्जता वेळोवेळी तपासून पाहण्यासाठी अनेक 'ट्रायल' इशारे आजपर्यंत देण्यात आले आहेत). म्हणजे, केवळ एका व्यक्तीच्या आदेशानुसार २० मिनिटांत जगाला विनाशाच्या खाईत लोटणारे अणुयुद्ध वास्तवात येऊ शकते. मॅकनामारा यांच्या काळापासून या व्यवस्थेत काहीही बदल झालेला नाही. शीतयुद्धाच्या काळात सोविएत रशियाचीही अशीच जय्यत तयारी असणार हे उघडच आहे.

नव्या शतकात, शीतयुद्ध संपले असले तरी आता परिस्थिती आणखी चिंताजनक बनली आहे. कारण, एकीकडे अमेरिकेची परराष्ट्रविषयक धोरणे अण्वस्त्रांच्या मुद्याभोवतीच फिरत आहेत; तर दुसरीकडे, अण्वस्त्रांचा प्रसार जगभरातील इतरही राष्ट्रांमध्ये होत आहे. अण्वस्त्रे तयार न करणाऱ्या अनेक युरोपीय राष्ट्रांजवळ अमेरिकेकडून मिळालेली अण्वस्त्रे आहेत, हीदेखील वस्तुस्थिती आहे. याशिवाय आंतरराष्ट्रीय राजकीय समीकरणेही बदलत आहेत. त्यामुळे अलीकडेच फ्रान्सनेदेखील आपल्या अण्वस्त्रविषयक धोरणात बदल केला आहे. त्यातच काळजी करण्यासारखी बाब म्हणजे अण्वस्त्रे वा त्यांच्या निर्मितीसाठी लागणारी साधनसामग्री, तंत्रज्ञान इत्यादी दहशतवाद्यांच्या हाती लागण्याची शक्यताही आहे. तसेच एखादा अण्वस्त्रसज्ज देश वा अण्वस्त्रनिर्मितीची क्षमता असणारा देश दहशतवादी ताब्यात घेण्याची शक्यताही नाकारता येत नाही. हे धोक्याचे ठरू शकते; कारण, जेव्हा काही देशांजवळ अण्वस्त्रे असतात तेव्हा त्यांचा वापर होऊ नये यासाठी राजकीय पातळीवर चर्चा तरी करता येतात. पण दहशतवादी आततायी निर्णय घेऊन संपूर्ण जगालाच विनाशाच्या खाईत लोटू शकतात.

अमेरिकेच्या धोरणांवर टीका करणारे काही अभ्यासक अण्वस्त्रांविषयक वेगवेगळ्या बाबी पुढे आणतात. अमेरिकेने पूर्वी B61 हा अणुबॉंब तयार केला होता. त्याचेच एक नवे रूप म्हणजे B61-11 असून त्याची सध्या चर्चा आहे. जमिनीत खोलवर असलेली बंकर्स उद्ध्वस्त करणारे हे बॉंब इराक युद्धाच्या वेळी सद्दाम हुसेन यांना ठार करण्यासाठी वापरण्यात येतील, असे म्हटले जात होते. मात्र अमेरिकेने इराकच्या युद्धात त्यांचा वापर केला किंवा कसे याची कागदोपत्री नोंद कुठेही नाही. हे बॉंब जमिनीच्या पोटात फक्त २० फूट खोल शिरतात व ते नागरिकांसाठी हानिकारक नाहीत, असे अमेरिकेने म्हटले असले तरी ते धोकादायकच आहेत, असे टीकाकारांचे म्हणणे आहे.

अण्वस्त्रांच्या संदर्भात सध्या अमेरिका व उत्तर कोरिया आणि अमेरिका व इराण असा वाद चालू आहे. त्या पार्श्वभूमीवर, अमेरिकेने हेच बॉंब उत्तर कोरियाच्या विरोधात वापरले तर त्यातून बाहेर पडणाऱ्या किरणोत्सर्गामुळे कोरियाच्या नजीकच्या देशांमध्ये, तसेच, हे बॉंब जर अमेरिकेने इराणच्या विरोधात वापरले तर मध्यपूर्वेत - मध्य आशियातील काही देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर विध्वंस घडून येईल, असे काही अभ्यासक-टीकाकार म्हणतात. शिवाय, सध्याच्या बुश प्रशासनाने जुनी अण्वस्त्रे कार्यान्वित करण्याचेही ठरविले आहे, असे म्हटले जाते. अगदी अलीकडे तर अमेरिकेतील संशोधक ज्या अण्वस्त्रांची चाचणी घेण्याची गरजच भासणार नाही अशांची निर्मिती करता येईल का, असा शोध घेत आहेत. याला Reliable Replacement Warhead असे म्हणतात. अर्थात ती कार्यान्वित होण्यासाठी काही काळ जाईल. दरम्यान, अमेरिकेची परराष्ट्रविषयक धोरणे जगाला धोक्याच्या वळणावर आणून ठेवत असल्याचे मत आणखी काही अभ्यासकांनी मांडले आहे.

मॅकनामारा आणि इतर अनेक ज्येष्ठ लष्करी अधिकाऱ्यांच्या मते परिस्थिती गंभीर आहे आणि या संदर्भात त्वरेने हालचाल करणे गरजेचे आहे. जगाला अणुयुद्धाच्या शक्यतेकडे जाऊ न देण्याचे आव्हान आता संयुक्त राष्ट्र संघाने स्वीकारावे आणि अण्वस्त्रप्रसारबंदी कराराचे उल्लंघन करणाऱ्या देशांना राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेसमोर खडे करावे, अशी त्यांची भूमिका आहे. काही देशांनी ही कल्पना उचलून धरलेली असली तरी त्याबाबत फारसे काही घडलेले नाही. ते असेही म्हणतात की, उत्तर कोरिया, इराण अशा काही राष्ट्रांच्या अण्वस्त्रविषयक कार्यक्रमावर निर्बंध आणणे हे कठीण असले तरी तेथील राजवट बदलून त्यांना अण्वस्त्रविकासापासून मागे फिरायला लावायचे, हे बुश सरकारचे धोरण उचित नाही. दहशतवाद्यांनी अण्वस्त्रे तयार करू नयेत यासाठी मात्र काहीतरी उपाययोजना आखता येणे शक्य होईल (काहींच्या मते आतापर्यंत दहशतवाद्यांनी अण्वस्त्रे जमविली असण्याची शक्यता आहे). अण्वस्त्रनिर्मितीची साधनसामग्री एकत्र करून तिच्या रक्षणाची हमी (राष्ट्रसंघाने ?) घेणे हे धोरण योग्य ठरू शकेल. या संदर्भात, शीतयुद्ध संपल्यानंतर तत्कालीन सिनेटर सॅम नन व रिचर्ड लुगार यांनी आखलेली योजना आजही महत्त्वाची ठरते. अमेरिकेने आता त्याच दिशेने जायला हवे. केवळ एवढेच पुरेसे नाही, तर जगाच्या उज्ज्वल भविष्यासाठी जगातून अण्वस्त्रे हद्दपारच व्हायला हवीत. अन्यथा जगाची वाटचाल विनाशाकडे होतेच आहे !

# प्रशिक्षणाची कवचकुंडले

आर्थिक सुधारणांची प्रक्रिया जोपर्यंत कामगार क्षेत्राच्या उंबरठ्याबाहेरच असते तोवर तिला सर्वसाधारणपणे फारसा विरोध होताना दिसत नाही, असाच जगभरचा अनुभव आहे. भारतही त्यास अपवाद नाही. भारतातील 'फर्स्ट जनरेशन रीफॉर्म्स' आता बऱ्यापैकी मार्गी लागलेले असल्याने 'सेकंड जनरेशन रीफॉर्म्स'चे युग सुरू करावे, असे मत विविध व्यासपीठांवरून हिरीरीने मांडले जाते. कामगार क्षेत्रातील सुधारणा हा या 'सेकंड जनरेशन रीफॉर्म्स'चा एक महत्वाचा भाग असल्याने सुधारणांचा हा टप्पा आता गतिमान व्हावा, यांबाबत औद्योगिक क्षेत्रही आग्रही आहे. मात्र, कामगारविषयक सुधारणांमध्ये कंत्राटी वा/तसेच हंगामी कामगारांचा मुद्दा तुलनेने अधिक संवेदनशील असल्याने या सुधारणांना कामगार संघटनांचा विरोध आहे.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत औद्योगिक क्षेत्राच्या पुनर्रचनेबरोबरच कामगार क्षेत्राच्या फेररचनेची प्रक्रियाही जगातील विविध देशांमध्ये अपरिहार्यपणे घडून आलेली दिसते. 'हंगामी कामगार'नामक, कामगारांच्याच एका मोठ्या उपगटाची निर्मिती, त्यांच्या संख्येत झालेली वाढ हे या साऱ्या घुसळणीचेच एक अपत्य. कामगारविषयक सुधारणा वा बदलांना आपल्याप्रमाणेच जगभरच विरोध झाला. देशकालपरत्वे त्याचे स्वरूप व तीव्रता वेगळी असेल एवढेच. मात्र, या साऱ्या घुसळणीमधून, परदेशांत, विशेषतः युरोपात हंगामी कामगारांचे हित जपण्यासंदर्भातील काही सकारात्मक प्रणालीही निपजल्या. या प्रणालींचा मुख्य भर आहे तो अशा हंगामी कामगारांच्या कौशल्यवाढीसाठी व्यवसायशिक्षणाच्या योजना व उपक्रमांची आखणी-अंमलबजावणी करण्यावर. विशेषतः, संघटित क्षेत्रातील रोजगारवाढीचा वेग मंदावत असताना, एकंदरच उत्पादनप्रक्रियेत श्रमशक्तीचे प्रमाण मर्यादित ठेवण्याकडे सार्वत्रिक कल असताना, कामगार दलात नव्याने समाविष्ट होणाऱ्या कामगारांना रोजगाराच्या नवनवीन संधी उपपब्ध करून देणे, त्यांना मिळालेला हंगामी रोजगार टिकून राहावा यासाठी त्यांच्या ठायीच्या व्यावसायिक कौशल्यांमध्ये सातत्याने वाढ घडवून आणणे, कामगार क्षेत्रातील अपरिहार्य अशा फेररचनेदरम्यान रोजगाराला मुकण्याची परवशता ओढवलीच तर त्याच अथवा वेगळ्या प्रकारच्या कामात/उद्योगात त्यांना रोजगार मिळावा यादृष्टीने कामगारांच्या कौशल्यांमध्ये

वैविध्य आणणे, त्याद्वारे त्यांची रोजगारक्षमता वाढविणे या दिशेने युरोपातील काही देशांमध्ये अलीकडील दशक-दोन दशकांत डोळसपणे प्रयत्न झाले. हंगामी कामगार, अशा कामगारांच्या संघटना, उद्योगक्षेत्र व कंपन्या आणि सरकार यांनी एकत्रितरीत्या या अशा प्रशिक्षण प्रयत्नांची उभारणी केली, आणि श्रमांच्या बाजारपेठेतील विद्यमान अस्थिरतेपासून त्यांना एक संरक्षक कवच उपलब्ध करून दिले, हे त्याचे वैशिष्ट्य. त्यातही पुन्हा, ब्रिटन, इटली, फ्रान्स आणि नेदरलंड्स् या चार देशांमधील प्रयोग अभ्यसनीय ठरतात.

या चारही देशांमधील हंगामी कामगारांचे क्षेत्र अलीकडील दशकभरात चांगलेच विस्तारले आहे, सशक्त बनले आहे. त्याच्या जोडीनेच अशा हंगामी कामगारांच्या संस्था-संघटनांच्या संख्येतही वाढ झाली आहे. या चारही देशांमधील हंगामी कामगारांचे विश्व हे त्यामानाने पुरेसे लवचीक, बदलत्या आर्थिक-औद्योगिक वास्तवाशी सुलभतेने जुळवून घेणारे असे आहे. या चार देशांच्या एकंदर अर्थव्यवस्थेच्या जडणघडणीचे प्रतिबिंब त्या त्या देशांतील हंगामी कामगारांच्या क्षेत्रातही पडलेले जाणवते. फ्रान्स आणि इटली या उभय देशांच्या अर्थकारणात वस्तुनिर्मितीप्रधान उद्योगक्षेत्राचे प्राबल्य आहे. या दोन देशांमधील हंगामी कामगार दलात पुरुषांचे असणारे आधिक्य या वास्तवाशी सुसंगत असेच आहे. त्या तुलनेत, नेदरलंड्स्ची अर्थव्यवस्था ही सेवाउद्योग प्रधान असल्याने तेथील हंगामी कामगारांच्या विश्वात महिला कामगारांचेही प्रमाण लक्षणीय आहे. या चारही देशांमधील हंगामी कामगारांच्या फौजेत वयाने तरुण असणाऱ्या (विशी-पंचविशीतील) होतकरूंचे प्रमाण बरेच अधिक आहे. साहजिकच या चारही देशांमधील हंगामी कामगारांच्या संघटनांनी हंगामी कामगारांच्या गुणकौशल्यवाढीसाठी व्यवसाय शिक्षणाचे वेगवेगळे प्रयोग राबविण्याचे काम अतिशय नेटाने हाती घेतले.

हंगामी कामगारांसाठी राबवावयाच्या प्रशिक्षण कार्यक्रमांच्या आखणी-तामिलीमध्ये हंगामी कामगार संघटनांची भूमिका ही मध्यवर्ती असली तरी त्यांत सरकार आणि हे हंगामी कामगार ज्या ठिकाणी वा ज्या कंपन्यांमध्ये काम करतात त्या कंपन्या या अन्य दोन घटकांचा सहभागही तितकाच कळीचा ठरतो. प्रशिक्षणाचा सारा भर हा पुस्तकी ज्ञानाला प्रत्यक्षानुभवाची जोड देण्यावर ठेवला जातो. श्रमांच्या बाजारपेठेत आणि उद्योग-व्यवसायांकडून ज्या प्रकारच्या व्यावसायिक कौशल्यांना मागणी आहे अशा मागणीशी हे प्रशिक्षण सुसंवादी राहील, याची दक्षता बाळगण्यात येते. कौशल्यविषयक

गरजा, त्यांत होत असणारे बदल, त्या बदलांची दिशा हे जोखून-अनुमानून कामगारांच्या ठायी व्यावसायिक ज्ञान व कौशल्ये तयार व्हावीत, अशा पद्धतीने प्रशिक्षण कार्यक्रमांची रचना असते. तसेच, प्रशिक्षणादरम्यान सातत्यशील मूल्यमापन करण्यावरही या प्रणालीत भर दिलेला आहे.

प्रशिक्षणाचा रोख आणि भरही संतुलित राहील याची काळजी घेतली जाते. हंगामी कामगार ज्या ठिकाणी काम करीत आहे त्या ठिकाणी त्याच्याकडून असलेल्या अपेक्षा, हंगामी कामगाराच्या ठायी मूलभूत औद्योगिक-व्यावसायिक कौशल्ये तयार करण्याची गरज आणि आज हंगामी तत्वावर काम करणाऱ्या कामगाराचे दीर्घकालीन 'करिअर' घडविण्याचे उद्दिष्ट या तीनही परिमाणांचे भान प्रशिक्षण कार्यक्रमाचे अंतरंग ठरविताना राखले जाते. याचाच अर्थ हा की हंगामी तत्वावर काम करणाऱ्या कामगाराच्या तात्कालिक तसेच दीर्घकालीन व्यावसायिक शिक्षणविषयक गरजांचे संतुलन या प्रशिक्षणाद्वारे साधले जाते आहे अथवा नाही, याकडे लक्ष पुरविले जाते.

अशा प्रशिक्षण उपक्रमांना पुरेसा निधी-पुरवठा होत राहणे अगत्याचे आहे, हे ओघानेच येते. किंबहूना, अशा उपक्रमांची यशस्विता या एका कळीच्या घटकावरच अवलंबून असते. या संदर्भात या चारही देशांमध्ये वेगवेगळी, स्थानीय परिस्थितीशी सुसंवादी असणारी 'मॉडेल्स' अस्तित्वात आलेली दिसतात. प्रशिक्षण कालावधीदरम्यान प्रशिक्षणार्थी हंगामी कामगाराला इटलीमध्ये नियमित मेहेनताना अदा केला जातो. फ्रान्सने तर अशा प्रशिक्षण कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी सरकारी प्रमाणपत्रधारक प्रशिक्षण निधीची निर्मिती केली आहे. या निधीसाठी उद्योगांकडूनही अर्थसाह्य मिळते. प्रशिक्षणासाठी येणारा खर्च हंगामी कामगारांच्या संघटना तसेच हे कामगार जिथे काम करीत असतात त्या कंपन्या संयुक्तपणे उचलत असल्याचीही उदाहरणे आहेत. हंगामी कामगार जेव्हा अशा प्रकारच्या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये सहभागी होतात तेव्हा त्यांना खास सुटीही दिली जाते. इटलीमध्ये तर दर तीन वर्षांनी हंगामी कामगारांना १५० तासांची खास 'प्रशिक्षण सुटी' मिळण्याची तरतूद आहे.

या चारही देशांमधील या प्रशिक्षण कार्यक्रमांचे वेळोवेळी मूल्यमापन करण्याबरोबरच त्यांच्या परिणामकारकतेचीही चाचपणी केली जात असते. या पाहण्यांचा एक निष्कर्ष असा आहे की, अशा प्रशिक्षणाची कवचकुंडले ल्यालेल्या एकूणांतील सुमारे एक तृतीयांश हंगामी कामगारांना, प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर ,सर्वसाधारणपणे, हंगामी रोजगाराच्या क्षेत्राबाहेर रोजगार मिळतो. आणखी काय हवे ?

# व्यथा शहरी वृद्धांच्या

दोन देश....दोन लाटा...मृत्यूचा अतर्क्य खेळ....आणि असंख्यांच्या हतबल मरणांमधून सामोरे आलेले एक अनोखे जग...अस्ताव्यस्त पसरलेल्या, दिसीमाशी फैलावणाऱ्या, अफाट गर्दीने गजबजलेल्या महानगरांमध्ये एकाकी, असहाय्य आणि उपेक्षित जीवन व्यतीत करणाऱ्या वयोवृद्धांचे...!

अमेरिकेला १९९५ साली तर, फ्रान्सला २००३ साली भेट देऊन गेलेल्या उष्णतेच्या प्रत्येकी एकेका लाटेने जागतिकीकरण, शहरीकरण, वाढणारे आयुर्मान, बदलती आणि कमालीची वेगवान झालेली आजची नागर जीवनशैली, विसविशीत झालेली मानवी आणि सामाजिक संबंधांची वीण, काळाच्या ओघात अपरिहार्यपणे पालटलेली कुटुंबव्यवस्था, दोन पिढ्यांमधील पालटलेले नाते आणि वाढलेले अंतर या साऱ्याच वास्तवाचे एकदम अनोखे आयाम जगासमोर मांडले. हे आयाम होते निवृत्तीनंतरचे जीवन महानगरांमध्ये व्यतीत करणाऱ्या शहरी वयोवृद्धांना वेढणाऱ्या वास्तवाचे आणि बदलत्या नागर जीवनशैलीबरोबर प्रसवणाऱ्या नित्यनूतन प्रश्नांचे.

अमेरिकेतील शिकागो शहरात १९९५ साली आलेली उष्णतेची लाट चांगली महिनाभर टिकली. या काहिलीने तब्बल ६०० शिकागोवासियांचा बळी घेतला. या हलकल्लोळादरम्यान एक बाब प्रकर्षाने प्रकाशात आली ती अशी की, या मृतांमध्ये जवळपास तीन चतुर्थांश प्रमाण होते ६५ वर्षांवरील वयस्कर नागरिकांचे. उष्णतेच्या या लाटेने शहरातील विटांची घरे तसेच अपार्टमेन्ट्स् भट्टीसारखी रसरसून तापली. साहजिकच, पंखे, वातानुकूलन यंत्रे, रेफ्रिजरेटर्स, कूलर्स यांचा वापर एकदम वाढला. त्यापायी शहरांतर्गत विजेची मागणी आणि वापर यांत अनेक पटीने भर पडली. सुरुवातीस काही काळ वीज टिकली व पुरली. नंतर मात्र शहरात विजेचा तुटवडा जाणवू लागला. ही टंचाई उत्तरोत्तर तीव्र होत गेली. घराघरांतील दूरदर्शन संच, रेडिओ यांसारखी माध्यमे विजेअभावी बंद झाली. हवामानातील बदल, अंदाज, ऊष्ण हवामानादरम्यान घ्यावयाची काळजी, वैद्यकीय सल्ला काहीच मिळेनासे झाले. यात सर्वाधिक भरडून निघाले ते एकाकी वृद्ध तसेच शेजारपण नसलेली वयस्कर कुटुंबे. उंचच उंच इमारतींमध्ये शेजारपाजार एक तर अनोळखी किंवा जागा सोडून दूर गेलेला,

भेटायला येणारेजाणारे कोणीच नाहीत. डिहायड्रेशन तसेच उष्णतेमुळे होणाऱ्या आजारांचा फैलाव झाला. ज्यांना कोणत्याही प्रकारचे उपचार वा मदत मिळू शकली नाही अशा वृद्धांना त्यांच्या राहत्या घरातच मृत्यूने गाठले. या साऱ्या घटिताला असणारे आणखी एक करुण परिमाण म्हणजे उष्णतेच्या लाटेत मृत्युमुखी पडलेल्या वयोवृद्धांपैकी १७० व्यक्तींच्या नातेवाइकांना या आकांताचा पत्ताच नव्हता. आपल्या घरातील एक ज्येष्ठ माणूस बेपत्ता आहे, याची जाणीवही त्यांना झालेली नव्हती. अशा नातेवाइकांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रशासनाला एक मोहिमच हाती घ्यावी लागली !

फ्रान्समध्ये २००३ साली आलेल्या उष्णतेच्या लाटेनंतर तिथे आढळून आलेले वास्तव बऱ्यापैकी समांतर असेच होते. या लाटेमध्ये एकंदर १० हजारांहून अधिक व्यक्ती मृत्युमुखी पडल्या. यापैकी निम्मे नागरिक वयोवृद्ध होते. तेही पुन्हा खास वृद्धांसाठीच्या संस्थांमध्ये राहणारे. मृतांपैकी जवळपास दोन हजार ज्येष्ठ नागरिक स्वतःच्या घरातच राहत होते. मात्र, घरात अन्य कोणीही नसल्याने, अथवा घरातील बाकीची माणसे सहलीसाठी दूर गावी गेल्याने कोणत्याही प्रकारची मदत वा वैद्यकीय साहाय्यच त्यांना मिळू शकले नाही. आता, समाजातील वयोवृद्धांची विशेष काळजी घेतली जावी तसेच त्यांची वेळेवर व योग्य शुश्रूषा व्हावी या हेतूने निर्माण करण्यात आलेल्या अशा संस्थांमध्येच हे असे का घडावे, संस्थांमध्ये देखभालीसाठी पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध नव्हते का, सहलीसाठी वा पर्यटनासाठी बाहेरगावी गेलेल्या नातेवाइकांशी संपर्क साधता येणे अशक्य झाल्याने प्राणहानीचे प्रमाण वाढले असावे का, यांसारख्या कळीच्या मुद्द्यांवर अजूनही अभ्यास व संशोधन चालूच आहे.

या दोन्ही घटना जितक्या दुःखद तितक्याच करुण आहेत. हे असे अपवादानेच घडते; भारतासारख्या देशात कुटुंबव्यवस्था आजही चांगल्यापैकी शाबूत असल्याने, घरातील वयोवृद्धांची काळजी घेणाऱ्या वृत्ती व संस्कृती सजग असल्याने हे चित्र आपल्याकडे दिसणार नाही, असेही म्हणता येईल. परंतु, बदलत्या नागरी जीवनशैलीपायी समाजातील वयोवृद्धांच्या प्रश्नांना शहरीकरणामुळे कसे नवनवीन आयाम प्राप्त होत आहेत, याची झलक मात्र त्यांतून स्पष्टपणे दिसते. संपूर्ण जगभरातच हे बदल घडून येत आहेत. आरोग्याच्या वाढत्या सुविधांमुळे सरासरी आयुर्मानामध्ये वाढ होत आहे, झाली आहे. त्याच वेळी एकंदरच जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा प्रभाव शहरांच्या वाढीवर पडत असल्याने जगभरातील शहरीकरणाची प्रक्रियाही वेगळ्या वळणावर उभी ठाकलेली दिसते. अगदी अमेरिकेसारख्या प्रगत देशांतही हेच घडते आहे. शहरे

अस्ताव्यस्तपणे विस्तारत आहेत. अर्थउद्योगांच्या क्षेत्रात जे बदल होत आहेत, त्यांमुळे वेगवेगळ्या शहरांचे भागधेय बदलताना दिसते.

एकंदरच जगभरात सेवाउद्योगांचे प्राबल्य वाढत असल्याने वस्तुप्रधान उद्योगांची पारंपरिक केंद्रे असलेल्या शहरांचा कठीण कालखंड अवतरतो आहे. खाजगीकरणाचे हे युग असल्याने 'सरकार' या संस्थेच्या भूमिकेतही बदल होत आहे. नगरसंस्थांच्या सार्वजनिक गुंतवणूकीचा वेग घटता दिसतो. याचा प्रतिकूल परिणाम शहरांच्या मध्यवस्तीतील, जुन्या भागांतील सार्वजनिक सेवासुविधांचा दर्जा ढासळण्यात होतो. शहरांचा भौगोलिक विस्तारही होतो आहे. त्यातून उपनगरे वाढताना दिसतात. शहरांतील नव्या पिढीचा नैसर्गिक ओढा हा नव्याने विकसित होणाऱ्या या उपनगरांकडे वळतो आहे. जगभरातील नवीन पिढी शहरांच्या जुन्या वस्तीमधून नवनवीन उपनगरांकडे स्थलांतरण करताना दिसते. सामाजिक तसेच भावनिक कारणांपायी आणि मुख्यतः आर्थिक परिस्थितीमुळे वडीलधारी पिढी जुन्या शहरांतील मध्यवस्ती सोडण्याबाबत उदासीन दिसते. परिणामी, एकाकीपण वाढते. जुन्या शहरांतील खड्ड्यांनी व्यापलेले रस्ते आणि अंधारलेल्या गल्ल्या, शहरांतील रस्त्यांवरील वाहनांची अतोनात गर्दी, जुन्या वस्तीमधील जुनी घरे, पुरेशा देखभालदुरुस्तीअभावी त्यांची ओसरलेली रया अशा नानाविध अडचणींचा सामना जगाच्या विविध भागांतील वयोवृद्ध शहरवासियांना आज करावा लागत आहे. वाढते वयोमान, शहरांतील उपरोक्त अव्यवस्था यांपायी ज्येष्ठ नागरिकांना पाय मोकळे करण्यासाठी सुरक्षितपणे बाहेर पडणेही अलीकडे दुरापास्त होते आहे. शहरांमधील वाढत्या गुन्हेगारीचाही या वास्तवाला हातभार लागतोच. यामुळे घरातल्या चार भिंतींमध्येच अधिकाधिक वेळ व्यतीत करण्याची हतबलता वयोवृद्धांवर ओढवताना दिसते.

सगळ्यात दिलासादायक बाब ही की, हे चित्र पालटण्याच्या दृष्टीनेही जगाच्या विविध भागांत मंथन सुरू आहे. शहरांची रचना, नागरी पर्यावरणाची जडणघडण, शहरांमधील जमीनवापराचे नियोजन करीत असताना वयोवृद्धांच्या गरजांना त्यात केंद्रवर्ती स्थान मिळण्याबाबत सतर्कता, अशा नियोजनातील निर्णयप्रक्रियेत ज्येष्ठ नागरिकांचा सहभाग असण्याबाबतची दक्षता याबाबतच्या मंथनामधून ही जाणीव अलीकडे व्यक्त होताना दिसते. 'आंतरराष्ट्रीय वृद्ध नागरिक दिना'च्या निमित्ताने येत्या १ ऑक्टोबर रोजी या विविध पैलूंवर चर्चाविनिमय होऊन त्यातून सुयोग्य धोरणनिर्मितीस चालना मिळेल, अशी आशा धरावी का ?

## नागरीकरण

# आव्हान शहरीकरणातील असमतोलाचे

गेली सलग दोन वर्षे पर्जन्यराजाने धमाल उडवून दिली. आपल्या लहरीपणाद्वारे त्याने एका बाजूला हवामानतज्ज्ञांना विचारप्रवृत्त (आणि सचिंतही!) बनविले तर, दुसरीकडे मुंबई-पुण्यासह अनेक शहरांमधील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रशासनाची कसोटी पाहिली. खरे म्हणजे 'कसोटी' हा शब्दही बरीक सौम्यच म्हणावयास हवा. प्रांजळपणे बोलावयाचे तर पावसाने ठायीठायीच्या शहर प्रशासन यंत्रणेची पार भंबेरी उडविली. सपशेल त्रेधातिरपिट ! महामोहनगरी मुंबई, पुणे, सांगली, पंढरपूर, चिपळूण, नांदेड यांसारख्या केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे तर, अन्य राज्यांतील अहमदाबाद, बडोदा, कोलकाता यांसारख्या मोठ्या शहरांमधील परिस्थितीही काही फारशी वेगळी नव्हती. मोठ्या शहरांकडे मोहरा वळविणाऱ्या आपत्तींचा सामना करण्यास त्या शहरांचे स्थानीय व्यवस्थापन आणि प्रशासन अपुरे पडत आहे, अक्षम ठरत आहे, हेच चित्र थोड्याफार फरकाने सर्वत्र आढळून आले आणि येत आहे. केवळ पूर वा वादळे-भूकंपांसारख्या नैसर्गिक आपत्तींच्या तडाख्यांमुळेच शहरांचे प्रशासन ढेपाळून जात असल्याचे अनुभवास येते, असेही नाही. परिस्थिती सर्वसामान्य असतानाही शहरांतर्गत वाहतूक व्यवस्था, रस्ते, पाणीपुरवठा, शहरांत निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याची विल्हेवाट तसेच मलनि:सारण, सार्वजनिक आरोग्य, प्राथमिक शिक्षण यांसारख्या नागरी सेवांचे व्यवस्थापन व संगोपन यांबाबतही स्थानिक प्रशासन अकार्यक्षम ठरत असल्याचा प्रत्यय अलीकडे वारंवार येऊ लागला आहे.

महानगरांसह एकंदरच मोठ्या शहरांच्या व्यवस्थापनाचा प्रश्न उत्तरोत्तर उग्रच बनत चालला आहे. परिणामी, शहरांची सततच सुरू असलेली वाढ, अशा सातत्यशील वाढीचे नियोजन, शहरांतर्गत जमीनवापर, घरबांधणी, शहरांमधील पायाभूत सेवासुविधांचा पुरवठा व देखभाल-दुरुस्ती अशा विविध बाबींसह एकूणच शहरनियोजनाचा मुळापासून फेरविचार करण्याची निकड आता वेळोवेळी मुखर होऊ लागली आहे. अस्ताव्यस्त पद्धतीने वाढत असलेल्या शहरांच्या व्यवस्थापनाचा हा प्रश्न केवळ काही विशिष्ट शहरांपुरताच मर्यादित आहे, असेही म्हणता येत नाही. देशाच्या विविध भागांतील

सर्वच मोठ्या शहरांची परिस्थिती बव्हंशी सारखीच दयनीय आहे. भारतामध्ये शहरीकरणाची प्रक्रिया आजवर ज्या पद्धतीने साकारत आलेली आहे, त्यातच या अनवस्थेची काही बीजे दडलेली आहेत का, याचा शोध घेणे त्यामुळेच क्रमप्राप्त ठरते.

देशात आजमितीस अस्तित्वात असलेल्या शहरे तसेच नागरी विभागांच्या वाढविस्ताराचा गेल्या चार दशकांचा आलेख निरखला, संबंधित आकडेवारीचे अंतरंग तपासले तर एक बाब ठळकपणे डोळ्यात भरते; आणि ती अशी की नागरी विस्ताराच्या या प्रक्रियेत विविध आकारमानांच्या शहरांची वाढ ही बरीच असमान पद्धतीने होताना दिसते. भारतातील नागरीकरणासंदर्भातील पायाभूत आकडेवारी ही दशवार्षिक जनगणना अहवालांमध्ये संकलित केली जाते. लोकसंख्येच्या आकारमानानुसार देशभरातील शहरांचे एकूण सहा गटांत विभाजन केलेले आहे. या उतरंडीत सर्वांत वर (अग्रभागी) आहेत ती एक लाख वा त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असलेली शहरे. यांना 'पहिल्या प्रवर्गातील (category) शहरे' असे म्हणतात. एक लाखापेक्षा कमी परंतु ५० हजार वा त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असलेली शहरे ही या उतरंडीत दुसऱ्या क्रमांकावर येतात. त्यांना 'दुसऱ्या प्रवर्गातील नगरे', असे संबोधले जाते. लोकसंख्या ५० हजारांपेक्षा कमी मात्र २० हजार अथवा त्यापेक्षा अधिक असणारी तिसऱ्या क्रमांकावरील शहरे ही 'तिसऱ्या प्रवर्गातील नगरे', या गटात मोडतात. ज्या शहरांची लोकसंख्या ही २० हजारांपेक्षा कमी परंतु १० हजार वा त्यापेक्षा जास्त आहे, अशा शहरांची गणना ही 'चौथ्या प्रवर्गातील शहरे', म्हणून करण्यात येते. ज्या शहरांची लोकसंख्या ही १० हजारांपेक्षा कमी मात्र पाच हजार अथवा त्याहून अधिक आहे, अशांची वर्णी या उतरंडीत पाचव्या स्थानावर लागते आणि 'पाचव्या प्रवर्गातील शहरे', म्हणून त्यांचा निर्देश केला जातो. शहरांच्या या क्रमवारीत सर्वांत तळाला येणाऱ्या शहरांना 'सहाव्या प्रवर्गातील शहरे', असे नामाभिधान असून या शहरांची लोकसंख्या ही पाच हजारांपेक्षा कमी असते. ढोबळ मानाने बोलताना प्रवर्ग तीन, चार, पाच व सहामधील नागरी विभागांना 'लहान व मध्यम आकाराची शहरे' म्हणून संबोधले जाते.

या सहाही प्रवर्गातील शहरांच्या वाढीचा आलेख हा वेगवेगळा आहे. तो तसा असणे हे अपेक्षितच असले तरी त्यातील अनिष्ट बाब म्हणजे तो विषम आहे. भरीस भर म्हणून की काय, ही विषमताही पुन्हा उत्तरोत्तर वाढतच असल्याचे संबंधित आकडेवारी दर्शविते. लोकसंख्यावाढीचा विचार करता असे आढळून येते की, या सहा प्रवर्गांमधील, शिरोभागी असलेली मोठी - पहिल्या प्रवर्गातील - शहरेच अधिक वेगाने

पुढे जात आहेत. त्यांच्या तुलनेत, लहान व मध्यम आकाराच्या नागरी विभागांची - म्हणजेच प्रवर्ग चार, पाच व सहामधील शहरे - वाढ खुरटलेली वा खुंटलेलीच दिसते. भारतातील शहरीकरणाच्या प्रक्रियेतील असमतोलाचे दर्शन घडते ते इथे व असे. केवळ इतकेच नाही तर, या गटांतील शहरांच्या वाढीचा आलेख अस्थिरही आहे. या असमतोलाची चिकित्सा करताना असेही जाणवते की या प्रक्रियेस काही ऐतिहासिक घटकही काही अंशी जबाबदार आहेत. विशेषतः, ब्रिटिश अमदानीत तत्कालीन राज्यकर्त्यांनी तुलनेने अधिक भर दिला तो व्यापार अथवा लष्करी वा प्रशासकीयदृष्ट्या महत्वाच्या असणाऱ्या शहरांच्या वाढीवरच. पुणे, सुरत, दिल्ली, कानपूर, मीरत, बंगळूर ही शहरे त्या काळात वाढली ती याच न्यायाने.त्यातही पुन्हा झुकते माप मिळाले ते किनारपट्टीवरील शहरांना आणि बंदरांना. मुंबई, चेन्नई (तेव्हाचे मद्रास) आणि कोलकाता या तीन शहरांचा आणि साहजिकच त्यांच्या परिसरातील नागरी विभागांचा विकास हा प्रथम आणि अधिक वेगाने व निराळ्या प्रकारे घडून आला तो याच कार्यकारणभावानुसार. भारतातील नगरविकाससंदर्भात ज्या काही प्रवृत्ती वासाहतिक काळात जोपासल्या गेल्या त्यांचा प्रभाव साहजिकच स्वातंत्र्योत्तर काळातही बव्हंशी अव्याहत राहिला. परिणामी, शहरांच्या या व्यवस्थेतील काही शहरांच्या ठायी असणाऱ्या विकासक्षमतांचे संगोपन जोमाने झाले व ती शहरे नगरविकासाच्या प्रक्रियेत अग्रेसर राहिली व वाढली. व्यापारउदीम आणि उद्योगांना अशा आघाडीच्या शहरांचे आकर्षण न वाटते तरच विशेष. उद्योगधंदे, सेवाउद्योग तसेच एकंदरच अर्थव्यवहार आणि त्याच्याच जोडीने लोकसंख्या यांचे या मोठ्या शहरांमध्ये मग केंद्रीकरण होऊ लागले. केंद्रीकरणाची ही प्रवृत्ती गेल्या जवळपास अर्धशतकभराच्या कालावधीदरम्यान सातत्यशील राहिल्याने या गटातील शहरांच्या वाढीचा आलेख हा आगळावेगळाच दिसतो.

गेल्या दशक-दीड दशकात, जागतिकीकरणाच्या वाऱ्यांनी या प्रवृत्तीला खतपाणीच घातल्याचा अनुभव आहे. उदारीकरणाच्या पहिल्या टप्प्यात आर्थिक सुधारणांचा लाभ मिळालेल्या माहिती तंत्रज्ञान, माहिती तंत्रज्ञानाधारित सेवा, बँकिंग-विम्यासह अन्य वित्तीय सेवा यांची पसंतीही याच मोठ्या शहरांना राहिल्याने या उद्योगव्यवसायांचे केंद्रीकरण पुन्हा महानगरांमध्ये अथवा/आणि त्यांच्या परिसरातच होते आहे. अशा मोठ्या नगरा-महानगरांमध्ये पूरक उद्योगव्यवसायांचे असलेले साहचर्य, मोठी बाजारपेठ, कुशल मनुष्यबळ, व्यवसायाशी संबंधित निर्णय घेण्यासाठी आवश्यक असणाऱ्या माहितीची सुलभ उपयुक्तता, तिची वेगवान देवाणघेवाण, तज्ज्ञ सल्लागारांचे अशा

शहरांमधील वास्तव्य अशा नानाविध सोयीसुविधांमुळे मोठ्या शहरांमध्ये उद्योजकांना Agglomeration Economies चा लाभ मिळतो. त्याद्वारे, एकीकडे उत्पादनखर्चात कपात घडवून आणत दुसरीकडे उत्पादनाची मात्रा वार्ढविणे शक्य होते. वाढत्या उत्पादनाबरोबरच उत्पादन खर्च घटता राहिल्याने उत्पादनांच्या किमतीही स्पर्धात्मक पातळीवर ठेवता येणे शक्य होते. परिणामी, देशी तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील आघाडीही टिकविता येते. त्यामुळे, उद्योगव्यवसायांचा कल हा स्वाभाविकपणेच मोठ्या शहरांकडे अथवा त्यांच्या झालर क्षेत्रांकडे असतो. असे उद्योग आणि त्यांनी केलेली मोठी गुंतवणूक पहिल्या प्रवर्गातील शहरांमध्ये एकवटली की तिच्या बरोबरीनेच या गटातील शहरांमध्ये लोकसंख्येचेही केंद्रीकरण सुरू होते. मोठी शहरे आणि लहान व मध्यम आकाराची शहरे यांच्या वाढविस्तारात फरक दिसून येतो, तो यामुळेच. नागरीकरणाच्या विकासात ही सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे. पूर्वापार ती चालत आली आहे.

दशवार्षिक जनगणना अहवालांमध्ये संकलित केली गेलेली नागरीकरणासंदर्भातील सांख्यिकी या प्रक्रियेची साक्ष देणारी अशीच आहे. देशभरातील एकंदर नागरी लोकसंख्येचे या सहाही प्रवर्गांत झालेले विभाजन मोठे अभ्यसनीय आहे. पहिल्या प्रवर्गातील शहरांमध्ये देशातील नागरी लोकसंख्येचे मुख्यत्वाने होणारे केंद्रीकरण ही यातील सर्वांत लक्षणीय बाब. १९९१च्या जनगणनेनुसार, एकंदर नागरी लोकसंख्येपैकी तब्बल ६५ टक्क्यांहूनही अधिक नागरी लोकसंख्या ही एक लाख वा त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असणाऱ्या शहरांमध्ये एकवटलेली दिसते. दुसऱ्या तसेच तिसऱ्या प्रवर्गांतील शहरांमध्ये सामावलेल्या नागरी लोकसंख्येचे प्रमाण (एकूणांतील) पहिल्या प्रवर्गापेक्षा खूपच कमी म्हणजे अनुक्रमे जवळपास ११ टक्के आणि १४टक्के असे आहे. सगळ्यात मौज आहे ती सर्वांत खालच्या तीन प्रवर्गांत (प्रवर्ग चार, पाच व सहामधील शहरे). एकूणांतील नागरी लोकसंख्येचे या तीन प्रवर्गांतील शहरांमधील प्रमाण अतिशय कमी आहे इतकेच केवळ नव्हे तर, या प्रमाणातही सातत्याने लक्षणीय अशी घट घडून येते आहे. या प्रक्रियेद्वारे देशात साकारलेले नागरीकरण हे, म्हणूनच, 'टॉप हेवी' या प्रकारात मोडणारे आहे.

देशातील एकंदर नागरी लोकसंख्येचे या सहा प्रवर्गांतील शहरांमध्ये झालेले विभाजन असंतुलित आहे एवढेच केवळ नव्हे तर, या सहा गटांतील शहरांची लोकसंख्या ज्या दराने वाढताना दिसते ते चित्रही असमानच आहे. प्रवर्ग चार, पाच व सहा या तीन

गटांत गणना केल्या जाणाऱ्या शहरांच्या लोकसंख्यावाढीच्या दरांत परत विभिन्नता आढळून येते. चौथ्या तसेच पाचव्या प्रवर्गातील शहरांपेक्षा सहाव्या प्रवर्गातील शहरे ही याबाबतीत वेगळी दिसतात. या गटातील शहरांची वाढीची प्रक्रिया आणि थेट पहिल्या प्रवर्गातील (मोठ्या) शहरांच्या वाढीचे चालचलन यांत काही ठिकाणी साम्य आढळून येते. या संदर्भात १९९१ ते २००१ हे दशक लक्षणीय ठरते. पहिल्या आणि सहाव्या गटातील शहरांची लोकसंख्या या दशकादरम्यान जवळपास सारख्याच दराने (दरसाल सरासरी दोन टक्के) वाढत राहिल्याचे २००१ सालच्या जनगणना अहवालांतील आकडेवारी सांगते. या संदर्भातील आणखी एक लक्षवेधी बाब अशी की चौथ्या, पाचव्या आणि सहाव्या प्रवर्गातील शहरांच्या लोकसंख्यावाढीचा दर हा कमालीचा अस्थिर राहिलेला आहे. वेगवेगळ्या दशकांत आढळून आलेल्या लोकसंख्यावाढीच्या दरांतही लक्षणीय तफावत आहे. या दरांतील चढउतार दरसाल सरासरी ५.५ टक्के ते (-)०.२ टक्के एवढ्या मोठ्या 'रेंज'मध्ये फिरताना दिसते.

एकंदर नागरी लोकसंख्येचे या सहास्तरीय उतरंडीतील शहरांत वेगवेगळ्या प्रकारे झालेले केंद्रीकरण आणि सहा स्तरांतील शहरांच्या लोकसंख्यावाढीचे स्तरनिहाय वेगवेगळे असणारे दर यांत जसा फरक आहे, तसाच फरक या शहरांच्या सामाजिक-आर्थिक तोंडवळ्यातही आहे. उपभोगावर कुटुंबांचा जो खर्च होतो (Consumption Expenditure) त्या खर्चासंबंधातील जी सांख्यिकी राष्ट्रीय नमुना पाहणी अहवालांमध्ये उपलब्ध होते त्या आकडेवारीचे विश्लेषण केले असता जे चित्र दिसते ते चित्रही चिंतनीय असेच आहे. दारिद्र्यरेषेखाली जीवन कंठणाऱ्या कुटुंबांचे लहान आणि मध्यम आकाराच्या शहरांमध्ये असणारे एकूणांतील प्रमाण हे, एक लाख वा त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असणाऱ्या पहिल्या प्रवर्गातील शहरांतील प्रमाणाच्या तुलनेत अधिक दिसते. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांचे एकंदरांतील प्रमाण हे पहिल्या प्रवर्गातील शहरांमध्ये सुमारे १२ टक्के इतके आहे तर, हेच प्रमाण लहान व मध्यम आकाराच्या शहरांमध्ये तब्बल २४ टक्के इतके आहे ! सातत्याने वाढणाऱ्या लोकसंख्येपायी देशातील काही मोठ्या शहरांवर वाढत असलेला भार आणि त्यापायी स्थानिक प्रशासनावर पडणारा बोजा यांची मुळे या साऱ्या वास्तवात दडलेली आहेत. ✿✿

*(टीप : 'नागरी विभागांचे प्रशासन' या विषयावर भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीमध्ये ३० व ३१ जुलै २००६ रोजी एक राष्ट्रीय परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. त्या परिसंवादादरम्यानच्या चर्चेवर आधारित हा पहिला लेखांक).*

# मॉडर्निटी

सध्याच्या युगात केवळ 'मॉडर्न' असून भागत नाही. आजची धाव त्याच्याही पुढची आहे. सर्वत्र लगबग दिसते ती 'अल्ट्रा मॉडर्न' बनण्याची. म्हणूनच पदरी अगदी १० गाड्या असल्या तरी एखादे नवीन मॉडेल बाजारात आले की ते आपल्या पोर्चमध्ये दिसलेच पाहिजे, अशी असोशी शौकिनांना लागते. हीसुद्धा एक प्रकारची गतिमानताच. नित्य आवड नूतनाचीच. शोध सतत नाविन्याचाच. किंबहूना, सातत्यशील परिवर्तन, परिवर्तनातून प्रगती हाच तर मुळी 'मॉडर्निटी'चा गाभा आहे. मात्र, केवळ घड्याळे अथवा कॉम्प्युटर यांची नवनवीन मॉडेल विकत घेत सुटणे, रोज नवनवीन फॅशनचे कपडे घालणे वा केसांची ठेवण बदलणे एवढी आणि इतपतच 'मॉडर्निटी'ची संकल्पना वरपंग नाही. ती कमालीची सखोल आहे. परिवर्तनशील युगाचा संकेत घडविणाऱ्या या संकल्पनेला प्रदीर्घ इतिहास आहे. थेट पाचव्या शतकात या संकल्पनेचा तुरळक निर्देश सापडत असला तरी, व्यवहारात तिचा पुनरावतार झाला तो १७व्या शतकात. या प्रक्रियेचा अनुबंध फ्रान्समधील प्रबोधनपर्वाशी आहे. प्रबोधन पर्वानंतर विकसित होत होत साकारलेली समाजव्यवस्था अथवा समाजपद्धती म्हणजे 'मॉडर्निटी'. तर्काधिष्ठता, बुद्धिप्रामाण्य, परंपरेची चिकित्सा, स्वातंत्र्य हा 'मॉडर्निटी' निर्देशित करत असलेल्या पद्धतीचा गाभा. तर्काधिष्ठित प्रयत्नांनी मानवी गरजांची पूर्तता करण्यासाठी सक्रिय राहणे, हे या व्यवस्थेचे प्रधान मूल्य. म्हणूनच, 'मॉडर्निटी'ची सांगड ही वैज्ञानिक-तांत्रिक प्रगतीशी जुळलेली आहे. मात्र, म्हणून ही केवळ वैज्ञानिक-तांत्रिक-आर्थिक संकल्पना अथवा प्रक्रिया आहे, असे मात्र अजिबात नाही. ऐहिकता, शिस्त, निरीक्षण, मोजमाप, आकडेवारीनिशी अभ्यास, अभ्यासातील नेमकेपणा ही तर्काधिष्ठित बुद्धिप्रामाण्यवादाची व्यवहाराच्या प्रांतातील पूरक सामग्री. या कुमकेनिशी, मानवनिर्मित पारंपरिक श्रद्धा-संस्था-प्रणालींची बुद्धिप्रामाण्याच्या कसोटीवर कठोर छाननी आणि बदललेल्या काळाशी विसंगत ठरणाऱ्या प्रथा-परंपरा-प्रणाली व संस्थांना सोडचिठ्ठी हे 'मॉडर्निटी'चे सारभूत तत्व. या अर्थाने 'मॉडर्निटी'चे अनुयायी बनलेले, परंपरेच्या विचारहीन अनुकरणाच्या जोखडाखालून सुटलेले असे 'मॉडर्न' आपण खरोखरच आहोत का, हे ज्याचे त्यानेच तपासून पाहावे हे बरे !

# 'जेन्डर बजेट'चे पहिले पाऊल

'जेन्डर बजेट'ची संकल्पना ऑस्ट्रेलियामध्ये प्रथम अवतरली आणि त्यानंतर तब्बल दोन दशकांनी भारतीय अर्थविश्वात तिचा प्रवेश झाला. १९८४ साली या संकल्पनेचा प्रयोग ऑस्ट्रेलियात करण्यात आला आणि 'जेन्डर बजेट'ची संकल्पना भारतात राबविण्याबाबत अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनी ऐलान केले ते २००४ सालच्या आपल्या अर्थसंकल्पीय भाषणात. २००५-०६ या आर्थिक वर्षासाठीच्या अर्थसंकल्पात 'जेन्डर बजेट'ची संकल्पना राबविण्यात आली. केंद्र सरकारातील एकूण १० मंत्रालयांच्या अखत्यारीतील काही योजना/उपक्रमांचा समावेश 'जेन्डर बजेट' च्या त्या प्रयोगात करण्यात आला. २००६-०७ या वर्षासाठीच्या अंदाजपत्रकात या संकल्पनेचा पैस वाढविण्यात येऊन 'जेन्डर बजेट'च्या कक्षेत आणखी २४ मंत्रालयांमधील विविध उपक्रम/योजनांचा अंतर्भाव करण्यात आला. म्हणजेच आजमितीस केंद्र सरकारच्या एकूण ३४ मंत्रालयांमध्ये 'जेन्डर बजेट'चा प्रयोग सुरू आहे.

'जेन्डर बजेट' म्हणजे केवळ महिलांसाठीचे वेगळे, स्वायत्त अंदाजपत्रक नव्हे. लोककल्याणाचे जे विविध उपक्रम सरकार हाती घेते आणि त्यांच्या अंमलबजावणीसाठी अर्थसंकल्पात ज्या वित्तीय तरतूदी करते त्यांच्या लाभांचे महिलाकेंद्रीत केलेले लिंगनिहाय विवरण-विश्लेषण-परीक्षण म्हणजे 'जेन्डर बजेट'. अर्थसंकल्पीय तरतूदींच्या, महिला तसेच पुरुषांवर होणाऱ्या परिणामांची छाननी म्हणजे 'जेन्डर बजेट' ही या संकल्पनेची मूलभूत व्याख्या जरी असली तरी तिचा परीघ केवळ तेवढ्यापुरताच सीमित नाही. अर्थसंकल्पाच्या जडणघडणीतच महिलांचा वा महिला संघटनांच्या प्रतिनिधींचा सक्रिय सहभाग असणे, ही 'जेन्डर बजेट'च्या संकल्पनेची अंतिमतः अपेक्षित फलश्रुती गणली जाते.

मात्र, ही झाली बरीच पुढची पायरी. सरकारने तयार केलेल्या अर्थसंकल्पाची महिलाकेंद्रीत छाननी करून महिला कल्याण तसेच महिलांच्या सबलीकरणासाठी आखलेल्या योजना आणि त्यांपायी केलेल्या वित्तीय तरतूदींची चिकित्सा केली जाणे, अशा तरतूदींचे सरकारच्या एकंदर खर्चातील प्रमाण तपासणे, त्या अनुषंगाने सरकारच्या

महिलांविषयक प्रचलित धोरणांमधील कच्च्या दुव्यांवर बोट ठेवणे, ही 'जेन्डर बजेट'ची संकल्पना व्यवहारात रुजविण्यासाठी पहिले पाऊल उचलण्याची कृती मानली जाते. उत्साहवर्धक बाब अशी की, 'जेन्डर बजेट'ची संकल्पना भारतात समूर्त स्वरूपात साकारून दोन वर्षे होतात न होतात तोच या सजगतेची प्रचिती आली आहे.

सन २००६-०७ या वर्षासाठी जो अर्थसंकल्प केंद्र सरकारने मांडला त्याच्या अंतरंगाची चिकित्सा 'जेन्डर बजेट'च्या तत्वानुसार करण्यास आता अभ्यासक पुढे सरसावल्याने पहिले पाऊल उचलले गेले आहे. महिला आणि मुलींच्या सबलीकरणासाठी या अर्थसंकल्पात करण्यात आलेल्या वित्तीय तरतूदींचे एकंदर अर्थसंकल्पीय खर्चाशी असणारे प्रमाण केवळ ५.१ टक्के इतके अल्प असल्याचा या संशोधनाचा निष्कर्ष आहे. सन २००५-०६ या वर्षासाठीच्या अर्थसंकल्पात हे प्रमाण तर अवघे २.८ टक्के इतके अत्यल्प होते ! मात्र, ५.१ टक्के इतके दिसणारे हे वाढीव प्रमाणही वास्तवात फसवे असावे, असा या अभ्यासाचा एक सूचक संकेत आहे. याचे कारण असे की, 'जेन्डर बजेट'च्या अंतरंगात सरकारच्या काही विविक्षित योजना/उपक्रमांखातर केलेल्या वित्तीय तरतूदींचा अंतर्भाव करण्यासंदर्भात जी गृहितके वापरण्यात आली आहेत ती गृहितकेच मुळात सदोष आहेत असा अभ्यासकांचा दावा आहे.

एकात्मिक बालविकास कार्यक्रमासाठीची तरतूद, गर्भनिरोधकांचे विनामूल्य वाटप करण्यासंदर्भातील योजनेवरील निधी, बालकल्याणाच्या अन्य योजना आणि मुख्य म्हणजे ग्रामीण भागातील घरबांधणीस चालना देण्यासाठी आखण्यात आलेली 'इंदिरा आवास योजना' या उपक्रमांसाठी केलेल्या वित्तीय तरतूदींचा 'जेन्डर बजेट'च्या या प्रयोगात केंद्र सरकारने पूर्णपणे अंतर्भाव केलेला आहे. आता, बालविकास, कुटुंबकल्याण, बालसंगोपन ही केवळ आणि फक्त महिलांचीच जबाबदारी आहे, असे का मानावयाचे ? गर्भनिरोधकांच्या विनामूल्य वाटपासाठीच्या योजनेच्या लाभार्थी या मुख्यत्वे स्त्रियाच असणार, हे गृहीतक सरकार कशाच्या आधारे मांडते ? अभ्यासकांचा मुख्य आक्षेप आहे तो 'इंदिरा आवास योजने'साठी केलेल्या संपूर्ण वित्तीय तरतूदीचा अंतर्भाव 'जेन्डर बजेट'मध्ये करण्यास. या योजनेंतर्गत बांधलेल्या घरकुलाची नोंदणी पतिपत्नींच्या नावे संयुक्तरित्या होत असल्यामुळेच केवळ या योजनेचा समावेश 'जेन्डर बजेट'मध्ये करणे कितपत संयुक्तिक आहे ? ... अभ्यासकांनी उपस्थित केलेल्या या सगळ्याच प्रश्नांची उत्तरे लगोलग मिळणार नसली तरी 'जेन्डर बजेट'च्या तामिलीच्या दिशेने पहिले पाऊल उचलले गेले आहे, हेही नसे थोडके ! ✿✿

# लग्नाचा प्रसंग, विचाराने करावा यथासांग...

*काही ठिकाणी विवाह करिती/ वेड्यासारखा पैसा उधळिती/*
*उपयोग नाही ऐसा रीती/ कासयास आचरावी//*
*लग्नाचे अपार सोहळे/ विहीण-व्याही-मामे सगळे/*
*वऱ्हाडाचे गोंधळ सावळे/ यासि विवाह म्हणो नये//*
*अस्ताव्यस्त तारांबळ/ उधळपट्टी आणि धावपळ/*
*यासि म्हणावे कार्य अमंगळ/ खर्च निष्फळ पैशांचा//*
*लग्नाकरिता कर्ज करावे/ जन्मभरि व्याज भरीत जावे/*
*लग्नासाठी कफल्लक व्हावे/ कोण्या देवे सांगितले ? //*
*असोत अडी-अडचणी किती/ साधिलीच पाहिजे तिथी/*
*ऐसी का ठेवावी प्रवृत्ती/ रूढिबद्ध ? //*
*प्रसन्न हवा, पाणी ऋतु/ हाचि विवाहाचा मुहूर्तू/*
*बाकीचे झंझट फालतू/ समजतो आम्ही//*
*दिवस पाहावा सुंदर/ हवा, पाणी सोयीस्कर/*
*सर्वांसि होईल सुखकर/ म्हणोनिया//*
*खर्च नको भव्य मंडपाचा/ देखावा असावा निसर्गाचा/*
*अथवा सभामंडप मंदिराचा/ योजावा या कार्यासि//*
*वेळ, पैसा आणि श्रम/ वाचवावेत करोनि नेम/*
*गुणांस द्यावे महत्व परम/ जाति-धन-श्रम सोडोनि//*
*कपडे असती ते घालावे/ नसता धुवोनि स्वच्छ करावे/*
*अहेरादि नको, लग्नप्रसंगी यावे/ सर्वजन आदरे//*
*लग्नानिमित्त भेटीच देणे/ तरि उभयतांचा संसार सुरू व्हावा तेणे/*
*अथवा गावाचे फिटावे उणे/ ऐशी योजना करावी//*
*सारांश, लग्नाचा प्रसंग/ विचाराने करावा यथासांग/*
*समजोनि परिस्थिती वेळप्रसंग/ सर्व काही//*

***(ग्रामगीता : अध्याय २१, ओव्या ८१ ते ९० आणि ९७ ते ९९).***

कुटुंब हे विश्वाचे लघुरूप आहे, ही तुकडोजींची पायाभूत धारणा आहे. आपल्या खाजगी जीवनात आपण जसे वागतो त्याचेच प्रतिबिंब जगात पडत असते. व्यक्तिगत संसारांच्या पायावरच समाजमंदिराची उभारणी होत असते. या व्यक्तिगत संसाराचा प्रारंभ, कुटुंब आणि गृहस्थाश्रमाची पायाभरणी लग्नविधीद्वारे होते. विवाह हा आनंददायक आणि मृदू सोहळा असला तरी त्यातही भावनेने तार्किकतेवर मात करता कामा नये, याबाबत तुकडोजी कमालीचे दक्ष आहेत. म्हणूनच, विवाह हा स्वरूपतः मंगलमय विधी असला तरी लग्नवेळेची तारांबळ, उधळपट्टी, लगीनघाई, त्यामुळे होणारा सावळागोंधळ, बडेजाव या अवघ्या 'अमंगळ' बाबींपायी त्याचे पावित्र्य आणि गांभीर्य हरपते, असे ते स्पष्टपणे सुनावतात. नवीन संसाराची सुरुवातच जर का अशा अव्यवस्थेने झाली तर विश्वाच्या प्रपंचातही अनागोंदीच अनुभवास यावी, हे तर्कशुद्धच नाही का? स्वतःच्या लग्नातच जी व्यक्ती संयमाचे, काटेकोर हिशेबीपणाचे, काटकसरीचे मोल जपत नाही अशी व्यक्ती सामाजिक मालमत्तेची मात्र कसोशीने निगराणी राखेल, समाजाच्या संपत्तीची हेळसांड करणार नाही, अशी आशा बाळगणेच बाळबोध ठरते. लग्नसमारंभादरम्यान केल्या जाणाऱ्या अवाच्यासवा खर्चाचा, संपत्तीच्या प्रदर्शनाचा, पैशाच्या उधळपट्टीचा, बडेजावाचा तुकडोजींना मनस्वी तिटकारा असावा, हेही एकवेळ समजू शकते. परंतु, विवाहविधीशी संलग्न असणाऱ्या नानाविध धार्मिक बाबींचेही फोलपण त्वेषाने उघड करणाऱ्या तुकडोजींचे इथे होणारे आक्रमक दर्शन आगळेवेगळेच आहे. गाव, देश आणि समाजाच्या शाश्वत हिताचीच अखंड काळजी वाहणारे तुकडोजींचे विलक्षण मृदूकोमल मन, काळाच्या किती तरी पुढे उड्डाण करून, लग्नाशी निगडित असणाऱ्या विविध बाबींसंदर्भातील रूढीबद्ध पारंपरिक धारणा-संकेतांवर निर्मम हल्ला चढविताना वज्रकठोर बनते. अडीअडचणींचे डोंगर उभे ठाकले तरी पंचांगातून काढलेली लग्नाची तिथी गाठलीच पाहिजे का ? प्रसन्न वातावरण, शुद्ध हवा-पाण्याची मुबलकता आणि मुख्य म्हणजे सर्व आप्तेष्टांची सोय यांनी युक्त असणारा दिवस वा वेळ हाच खरा सुमुहूर्त, बाकी सारे व्यर्थ 'झंझट', असे छातीठोकपणे बजावणारे तुकडोजी आजच्या विज्ञाननिष्ठ (म्हणविणाऱ्या) युगात तरी कोणाला पचतील का ? लग्नप्रसंगी नवऱ्यामुलाने परिधान करावयाच्या पोषाखाच्या रकमेवरून घासाघीस करणाऱ्या तुम्हा-आम्हांला, 'अरे बाबांनो लग्नाच्या एका दिवसासाठी महागडे कपडे खरेदी करू नका, घरातलेच कपडे स्वच्छ धुवून वापरा', असे कळकळीने सांगणारे तुकडोजी आपलेसे वाटतात का, यांवरच 'ग्रामगीते'ची आजच्या जीवनातील प्रस्तुतता ठरणार आहे !

(पृष्ठ ४ वरून)
पर्यावरण, आर्थिक, महिला सक्षमीकरण असा विभागवार विचार करतो तसाच समग्र विचारही करता येणार नाही का ? आपण जेवढे विभाग पाडू तेवढा वैचारिक गोंधळ वाढतच जाईल असे वाटत नाही का ?

**विनायक श्री. महाजन, कुडावळे**

'अर्थबोधपत्रिके'तून अर्थकारण, समाजकारण, शिक्षण, विज्ञान व राजकारण, इत्यादी विषयांवर आकडेवारीसह अद्ययावत माहितीपर लेख असतात. त्यामुळे वाचकांच्या मेंदूला एकप्रकारे चौरस आहार मिळतो असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. मुंबई-पुण्यासारख्या शहरांत आढळून येणाऱ्या 'बांधकाम मजूर' या समाजघटकासंदर्भात अभ्यास करून आपण 'अर्थबोधपत्रिके'त लेख द्यावा, असे सुचवावेसे वाटते. तसेच जो कोणी वाचक एखादा विषय पत्रिकेमधून यावा असे सुचवेल व जेव्हाही तो लेख आपण प्रसिद्ध कराल तेव्हा त्याखाली, 'हा विषय या वाचकाने सुचविला होता,' अशी ओळ छापल्यास वाचक विषय कळविण्यास उद्युक्त होतील.

**सुधीर देशपांडे, विलेपार्ले, मुंबई**

## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

## 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

## संदर्भसूची

**जिहाद की इज्तिहाद व नव्या जगातील इज्तिहादकडे .....**

*(१) अमेरिकेतील 'सेंटर फॉर द स्टडी ऑफ इस्लाम' आणि 'युनायटेड स्टेट्स् इन्स्टिट्यूट ऑफ पीस' यांच्यातर्फे आयोजित करण्यात आलेल्या 'इज्तिहाद : री-इंटरप्रिटिंग इस्लामिक प्रिन्सिपल्स फॉर द ट्वेंटी फर्स्ट सेन्चुरी' या कार्यशाळेत सहभागी झालेल्या इस्लामी अभ्यासकांच्या चर्चेच्या आधारे डेव्हिड स्मॉक यांनी तयार केलेला अहवाल*

*(२) 'इस्लाम ऑन द इव्ह ऑफ ट्वेंटी फर्स्ट सेन्चुरी' - असगर अली इंजिनिअर*

*(३) दि ऑक्सफर्ड एन्सायक्लोपिडिया ऑफ द मॉडर्न इस्लामिक वर्ल्ड खंड १ ते ४ (१९९५)*

*(४) द कन्साइज एन्सायक्लोपिडिया ऑफ इस्लाम -स्टॅसी इंटरनॅशनल - लंडन (१९८९)*

*(५) 'कॅन ब्रिटिश इस्लाम चेंज' - झियाउद्दीन सरदार - न्यू स्टेटस्मन - ३ जुलै २००६*

*(६) मुस्लिम स्कॉलर्स इन अमेरिका पुश फॉर चेंज - फ्री मुस्लिम कोॲलिशन अगेन्स्ट टेरेरिझम*

*(७) मदरसे आणि जागतिक दहशतवाद - अनीस चिश्ती, सुशील प्रकाशन, पुणे (एप्रिल २००४)*

*(८)* www.islamicvoice.com, www.muslim.refusenik.com, www.timesonline.co.uk, www.populuslimited.com, www.freemuslims.org, www.irfi.org, www.19.org, www.asiansinmedia.org, www.intellectualconservative.com

**जग विनाशाच्या दिशेने ?** - *अपोकॅलिप्स सून - रॉबर्ट मॅकनामारा - फॉरिन पॉलिसी - मे-जून २००५, द गार्डियन, नेचर - ६ जुलै २००६, अपोकॅलिप्स निअर -* Ynet *- नोम चोम्स्की - ऑगस्ट २००६,* www.globalsecurity.org/wmd, www.fas.org, www. nuclearweaponarchive.org, www.globalresearch.ca, www.nukestart.com

**प्रशिक्षणाची कवचकुंडले** - *इंटरनेट*

**व्यथा शहरी वृद्धांच्या** - *एजिंग अँड सोसायटी - २४, २००४. पान क्रमांक - १६३-१७२ केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस, ब्रिटन.*

**आव्हान शहरीकरणातील असमतोलाचे** - *'नागरी विभागांचे प्रशासन' या विषयावर भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीमध्ये आयोजित करण्यात आलेले राष्ट्रीय चर्चासत्र - दिनांक ३० व ३१ जुलै २००६.*

**'जेन्डर बजेट'चे पहिले पाऊल** - *इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकली - २९ जुलै २००६, अर्थबोधपत्रिका - जानेवारी ते मार्च २००६*

## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे नवे प्रकाशन

आपल्या दैनंदिन जीवनावर प्रभाव पाडणाऱ्या क्रांतिकारी मेंदूसंशोधनावरील आकर्षक, सचित्र व संग्राह्य ग्रंथ

# कर्ता-करविता

### आधुनिक मेंदूसंशोधन व आपले जीवन

**मराठी भाषेला अभिमान वाटावा असे पुस्तक - डॉ. ह. वि. सरदेसाई**

● मेंदूसंशोधन ही एक क्रांतीच! मानवी जीवनाला अधिक उच्च टप्प्यावर नेणारी ऐतिहासिक घटना! या क्रांतीचा आलेख रेखाटणारा ग्रंथ.

पृष्ठे २४२ किंमत ३५०/-रु पये

**ग्रंथ घेणाऱ्यांना अर्थबोधपत्रिका मासिक एक वर्ष विनामूल्य**

## अर्थबोधपत्रिका वर्गणीदारांसाठी विशेष योजना

### (१ जून २००६ पासून)

वार्षिक वर्गणी फक्त १०० / - रुपये

द्वैवार्षिक वर्गणी फक्त १८० / - रुपये व 'अर्थबोधपत्रिके'चा मेंदूसंशोधन विशेषांक भेट

त्रैवार्षिक वर्गणी फक्त २६० / - रुपये व एक पुस्तिका भेट

पंचवार्षिक वर्गणी फक्त ४०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न, लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत तीस रुपये) (२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण, (इंग्रजी पुस्तिका) लेखक - जयकुमार अनगोळ (किंमत तीस रुपये) (३) सक्तीचे प्राथमिक शिक्षण, (मराठी पुस्तिका) लेखक - जयकुमार अनगोळ, अनुवाद - प्रा. रमेश पानसे (किंमत तीस रुपये) (४) शोध घेते ते शिक्षण, लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत - पन्नास रुपये)

## ग्रंथालयातील नवी पुस्तके

■War Economics in a Regional Context - Challenges of Transformation : Pugh, Michael; Cooper, Neil and Jonathan Goodhand: Viva Books Pvt. Ltd, New Delhi, 2005.

■Social and Economic Profile of India : Bajpai, Peeyush; Bhandari, Laveesh and Sinha, Aali: Social Science Press, New Delhi, 2005.

■Last Frontiers of the Mind - Challenges of the Digital Age: Moses A. Mohandas, Prentice-Hall of India Pvt.Ltd, New Delhi, 2005.

■Just a Theory - Exploring the Nature of Science : Ben-ari Moti, Prometheus Books, NewYork, 2005.

■Reimagining Growth - Towards a Renewal of Development Theory : (Ed.) DE Paula Silvana, Dymski Gary A. : Zed Books, London, NewYork, 2005.

■Putting Development First - The Importance of Policy Space in the WTO and IFIs : (Ed.) Gallagher, Kevin P. : Zed Books, London, NewYork, 2005.

■Change and Development in the Twentieth Century : Patterson Thomas C. , Berg, Oxford, New York, 1999.

■Women Plantation Workers - International Experiences : (Ed.) Jain Shobhita, Reddock Rhoda Berg, Oxford, NewYork, 1998.

■Fair Trade for All - How Trade can Promote Development : Stiglitz Joseph E, Charlton Andrew, Oxford University Press., Oxford, 2005.

■Power and Purpose - U.S.Policy toward Russia after the Cold War : Goldgeier James M., McPaul Michael, Brookings Institution Press, Washington, 2003.

■Where are National Capitalisms Now? : (Ed.) Jonathan , Perraton; Ben, Clift ; Palgrave Maxmillon, New York, 2004.

■Readings in Public Finance : (Ed.) Bagchi, Amaresh, Oxford University Press, New Delhi, 2005.

■Growth and Development in the Global Political Economy - Social Structures of Accumulation and Modes of Regulation : Anthony, O'Hara Phillip, Routledge , London, New York, 2006.

RNI, Regn.No. MAHMAR/2002/9806
Declaration Ref. P.H.M./S.R./180/VIII/2005
Postal Regn.No.PR/RNP/PNW/M/231/2003-2006
L.W.P. LICENCE NO. L-502
Posted at Market Yard P.S.O. on 10th of each month

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■ 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■ भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■ अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग - व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■ इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका योग्य नमुन्यात प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■ संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते. ■ संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■ अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

## - संस्थेचे नियंत्रण मंडळ -

•अजित कर्णिक •विकास चित्रे •कुमुदिनी दांडेकर
•ललित देशपांडे •द.ना. धनागरे •आनंद नाडकर्णी •रमेश पानसे
•मनोहर भिडे •नीळकंठ रथ •व्ही.एम्.राव •ए.वैद्यनाथन
•रामदास होनावर •योगेंद्र यादव

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक रामदास होनावर यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**